नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष १६ * अंक ३०३ * * भंडारा * मंगळवार, दिनांक २९ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## ईडी कार्यालयाला आग, अनेक फाइल्स खाक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :**
फोर्ट येथील बलार्ड इस्टेटमधील कैसर-ए-हिंद इमारतीत मध्यरात्रीच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत ईडी कार्यालयातील कागदपत्रे, फाइल्स आणि फर्निचर जळून खाक झाले. तब्बल सात तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आग नियंत्रणात आली.

न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक फसवणूक (१२२ कोटी), ललित टेकचंदानी मालमत्ता प्रकरण (४४.०७ कोटी), विंध्यवासिनी ग्रुप बँक फसवणूक (७६४.४४ कोटी), साई ग्रुप फ्लॅट फसवणूक (७२ कोटी), पॅनकार्ड क्लब्स गुंतवणूक फसवणूक (४५०० कोटी), रियाल्टो एक्झिम आणि पुष्पक बुलियन प्रकरण अशा अनेक फाईल्स जळाल्यात.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## पाकिस्तानातले भगोडे

भारताच्या नंदनवनात काही दिवसांपूर्वी निरपराध्यांच्या रक्ताचे पाट वाहिले गेले. ही कृत्ये करणाऱ्या अतिरेक्यांच्या पाठीशी शक्ती उभी करणाऱ्या पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांची लायकी काय आहे. ते दाखवणाऱ्या दोन बातम्या आमच्या समोर आलेल्या आहेत. एका बातमीत पाकिस्तानी लष्कराच्या जवळपास बाराशे बड्या बड्या अधिकाऱ्यांनी आपले राजीनामे दिलेले आहेत. आणखी काही मंडळी राजीनामे देण्याच्या बेतात आहेत. पाक लष्कराने कितीही बोंबाबोंब केली तरी पाकिस्तानच्या जन्मापासून ते कारगिल युद्धापर्यंत चार वेळा पाकिस्तानला भारताने चांगलेच ठोकून काढलेले होते. त्याआधी स्वतंत्र झाल्यावर 1971 सालामध्ये पुन्हा आपणच पाकिस्तानची विभागणी करून बांगलादेशची निर्मिती केली होती. त्यावेळी पाकिस्तानच्या जनरलपदी नियाझी नावाचे जे गृहस्थ होते. त्यांनी भारताच्या लष्करासमोर गुडघे टेकून शरणागती पत्करली होती. थोडक्यात काय तर भारत आणि पाकिस्तान यांच्या युद्धात पाकिस्तानने नेहमीच सपाटून मार खाल्लेला आहे. पाकिस्तानचे लष्कर पाकिस्तानात कितीही दादागिरी करत असले. तरी त्यांची सध्याची खरी परिस्थिती काय आहे. हे लष्करात काम करणाऱ्या सैनिकांना ठाऊक आहे. अभी मारा तो मारा, अब मार भला असे म्हणत म्हणत चांगल्या पद्धतीने कुटले गेल्यावर जोडे चाटण्याची सवय असलेल्या पाकिस्तानच्या लष्कराला भविष्याची कल्पना आलेली असावी. या सर्व उलाढालीमध्ये प्रत्यक्ष काय होते. ते ठाऊक असल्यावरही बिनकामाच्या लंब्या बाता करण्यासाठी पाकिस्तानच्या लष्कर प्रमुखांपासून इंदिराजी यांच्यासमोर गुडघे टेकणाऱ्या भुत्तोच्या नातवालाही आता धडकी भरलेली आहे. न जाणो भारताच्या लष्कराने आक्रमण करून पाकिस्तानच्या राजधानीवर कब्जा केला. तर आपले काय होईल, हे त्यांना ठाऊक आहे. म्हणूनच पाक लष्कर प्रमुखांचे कुटुंब आणि या दर्पोक्ती करणाऱ्या बिलावलचे म्हणजेच बिलावल भुत्तोचे कुटुंब परदेशात कॅनडा येथे गेलेले आहे. भारतातील या दहशतवादी हल्ल्याला लष्कर प्रमुख असलेल्या मुनीर याची चिथावणीच होती. हे काही लपून राहिलेले नाही. हा मुनीर पूर्वी आयएसआय चा प्रमुख होता. त्यानेच पुलवामा हल्ला करण्याचा कट घडवून आणला होता. काही दिवसांपूर्वी या मुनिराने काश्मीर बद्दल मोठे विधान केले. त्यानंतरच पाकिस्तानच्या काश्मीरमधील रावळकोट मधून प्रशिक्षण घेतलेल्या दहशतवाद्यांनी पहेलगामचे हे जघन्य हत्याकांड केले. सध्या पाकव्याप्त काश्मीर परत घेण्याबाबत भारतातील सत्ताधारी पक्षांनी त्यामध्ये संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा, विदेश मंत्री एस जयशंकर यांनी छाती ठोकून याबाबत ठाम विधान केले होते. या हल्ल्याचा बदला म्हणजे केवळ सिंधू नदीचे पाणी बंद करण्यापुरता होणार नाही. तर भारताला आपले काश्मीर परत मिळवण्यासाठी काही अपवाद सोडल्यास जागतिक पाठिंबा मिळाल्यामुळे पाकिस्तानने चोरलेले आपले काश्मीर घेण्याची हीच संधी आहे. हे आम्हाला नमूद करावेसे वाटते. ▶▶ पान ८ वर

## हजाराहून अधिक भारतीय पाकिस्तानहून परतले

# ८०० पाकींनी भारत सोडला

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २८ :**
पहलगाम हल्ल्याला सोमवारी सहा दिवस पूर्ण झाले. दिल्लीपासून श्रीनगरपर्यंत गोंधळ आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यात पंतप्रधान निवासस्थानी ४० मिनिटे बैठक झाली.

पहलगाम हल्ल्याबाबत चीनकडून एक विधान आले. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, आम्हाला या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी हवी आहे. भारत आणि पाकिस्तान हे शेजारी आहेत, दोन्ही देशांनी संवादाद्वारे त्यांचे मतभेद सोडवावेत.



वृत्तसंस्था पीटीआयनुसार, गेल्या ६ दिवसांत वाघा बॉर्डरमार्गे १ हजार भारतीय पाकिस्तानातून भारतात परतले आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर, पाकिस्तानला जाणाऱ्या भारतीयांना त्यांचा प्रवास वेळ कमीत कमी करण्यास सांगण्यात आले. त्याचप्रमाणे,

### चीन म्हणतो, हल्ल्याची निष्पक्ष चौकशी व्हावी

सोमवार २८ एप्रिल पर्यंत ८०० पाकिस्तानी लोक भारत सोडून गेले आहेत.

पहलगाम हल्ल्याच्या वृत्तांकनावरून केंद्राने १७ पाकिस्तानी युट्यूब चॅनेलवर बंदी घातली. यामध्ये क्रिकेटपटू शोएब अख्तर, डॉन न्यूज, समा टीव्ही आणि जिओ न्यूज यांचा समावेश आहे. सरकारचे म्हणणे आहे की, हे चॅनेल भारत आणि सुरक्षा एजन्सींविरुद्ध खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या बातम्या चालवत आहेत.

पहलगाम हल्ल्याचे वृत्तांकन करताना, बीबीसी दहशतवाद्यांना अतिरेकी म्हणत होते. गृह मंत्रालयाच्या शिफारशीनंतर सरकारने बीबीसीला इशारा दिला आहे.

जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी १५ ठिकाणी छापे टाकले आहेत. सूत्रांनी सांगितले की, पाकव्याप्त काश्मीर (पीओके) मधून कार्यरत असलेल्या आणि पहलगाम हल्ल्याशी संबंधित असलेल्या दहशतवाद्यांच्या लपण्याच्या ठिकाणी हे छापे टाकण्यात आले.

राष्ट्रीय जनता दल आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष यांनी पहलगाम हल्ल्यावर संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी केली आहे. आरजेडीचे खासदार मनोज झा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तर सीपीआयचे खासदार पी संतोष कुमार यांनी संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांना पत्र लिहिले आहे.

## पीडितांच्या जखमेवर मीठ चोळू नका

### वडेट्टीवारांच्या विधानावर फडणवीसांचा पलटवार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २८ :**



अतिरेक्यांकडे लोकांचा धर्म विचारायला वेळ असतो का? असा सवाल करणारे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार पलटवार केला आहे. अशा प्रकारची विधाने करून पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नातेवाईकांच्या जखमेवर मीठ चोळले जात आहे. अशा विधानांना मूर्खपणा म्हणावे की काय? हे समजत नाही, असे ते म्हणाले.

वडेट्टीवार यांनी सोमवारी पहलगाम हल्ल्याविषयी वादग्रस्त विधान केले. अतिरेक्यांकडे लोकांचा धर्म विचारून गोळीबार करण्याएवढा वेळ कुठे असतो? असे ते म्हणाले. त्यांच्या या विधानाचा मुख्यमंत्री फडणवीस यांनी समाचार घेतला. अशा प्रकारचे स्टेटमेंट देऊन जे लोक मृत्युमुखी पडलेत त्यांच्या नातेवाईकांच्या जखमेवर मीठ चोळले जात आहे. वडेट्टीवार तिथे घटनास्थळी होते का? इथे बसून अशी विधान करणे हे अतिशय वाईट असल्याचे ते म्हणाले.

फडणवीस यांनी यावेळी राज्यातील सर्वच पाकिस्तानी नागरिकांची ओळख पटवण्यात यश आल्याचेही सांगितले. ते म्हणाले, या प्रकरणी अद्याप आकडा स्पष्ट झाला नाही. पण पोलिस विभाग लवकरच हा आकडा जाहीर करेल. जे पाकिस्तानी नागरिक भारतातून बाहेर गेले पाहिजेत, अशा सर्व नागरिकांची ओळख पटवण्यात आली, त्यांच्याशी संपर्क साधण्यात आला आणि त्यांना बाहेर जाण्याचे निर्देश देण्यात आले. त्यांचे ट्रॅकिंगही सुरू आहे. त्यांची आकडेवारी लवकर सांगितली जाईल, असेही ते म्हणाले.

महत्त्वाकांक्षी बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या महाराष्ट्राच्या हद्दीतील काम २०२८ च्या अखेरपर्यंत पूर्ण होईल, मागील अडीच वर्षांत हे काम खूप वेगाने सुरू असून, हे काम आता नव्या टाईमलाईनमध्ये पूर्ण होईल, असे फडणवीस म्हणाले.

## तहव्वुरच्या कोठडीवरील निर्णय सुरक्षित

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २८ :**



मुंबईवरील २६/११ हल्ल्याचा सूत्रधार तहव्वुर हुसेन राणा याला आज दिल्लीच्या पटियाला हाऊस कोर्टात हजर करण्यात आले. त्याची कोठडी १२ दिवसांनी वाढवण्याच्या एनआयएच्या अर्जावर न्यायालयाने आपला निर्णय राखून ठेवला आहे.

एनआयएने १० एप्रिल रोजी तहव्वुर राणाला एका खास विमानाने अमेरिकेतून भारतात आणले. त्याचे प्रत्यार्पण 'ऑपरेशन राणा' या अत्यंत गुप्त मोहिमेअंतर्गत झाले. १० एप्रिल रोजी विशेष एनआयए न्यायाधीश चंद्रजित सिंह यांनी त्याला १८ दिवसांच्या कोठडीत पाठवले. राणाची कोठडी आज संपणार होती.

तहव्वुरला ऑक्टोबर २०९९ मध्ये अमेरिकेतील शिकागो येथे अमेरिकन एजन्सी एफबीआयने अटक केली होती. त्याच्यावर मुंबई २६/११ आणि कोपनहेगनमध्ये दहशतवादी हल्ले करण्यासाठी आवश्यक रसद पुरवल्याचा आरोप आहे.

तहव्वुर राणाला भारतात आणल्यानंतर एनआयएने त्याचा हा फोटो प्रसिद्ध केला होता. मात्र, त्यात त्याचा चेहरा दिसत नव्हता. तहव्वुर राणाला भारतात आणल्यानंतर एनआयएने त्याचा हा फोटो प्रसिद्ध केला होता. मात्र, त्यात त्याचा चेहरा दिसत नव्हता. कुटुंबाशी बोलण्याची याचिका न्यायालयाने फेटाळली.

## १०७ बेपत्ता? विधानांमुळे संभ्रम

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :**
महाराष्ट्रात १०७ पाकिस्तानी नागरिक बेपत्ता असल्याचे प्रकाशित वृत्त आणि मुख्यमंत्री फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विधानांमुळे संभ्रम निर्माण झाला आहे. मुख्यमंत्री फडणवीसांनी एकही नागरिक बेपत्ता झाला नसल्याचे स्पष्टीकरण पुणे येथे दिले. तर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी लपून बसलेल्या १०७ पाकिस्तानींना पोलिस शोधतील अन् तिथेच ठोकतील, असा इशारा दिला.

महाराष्ट्रातील ४८ शहरांत ५०२३ पाकिस्तानी नागरिक आढळले असल्याची माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी माध्यमांना दिली. नागपुरात २ हजार ४५८, ठाणे शहरात ११०६ तर मुंबईत १४ पाकिस्तानी नागरिक राहत असल्याची माहिती समोर आली आहे. महाराष्ट्रात आलेले १०७ पाकिस्तानी नागरिक बेपत्ता झाल्याचे आढळले आहेत.

दरम्यान, मंत्र्यांच्या या विसंगतपूर्ण विधानावरून संभ्रम पसरला आहे.



## क्रिकेटपटू आर. अश्विनला पद्मश्री : श्रीजेशला पद्मभूषण

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २८ :**
राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती भवनात २०२५ साठीचे पद्म पुरस्कार प्रदान केले. वर्षाच्या पहिल्या पद्म समारंभात ७१ व्यक्तींना पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. तर उर्वरित सेलिब्रिटींना लवकरच एका वेगळ्या समारंभात सन्मानित केले जाईल. समारंभात ४ पद्मविभूषण, १० पद्मभूषण आणि ५७ पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आले.

दक्षिण भारतीय अभिनेता अजित आणि दिग्दर्शक शेखर कपूर यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पद्मभूषण पुरस्कारासाठी १९ व्यक्तींची निवड करण्यात आली आहे. ११३ व्यक्तिमत्त्वांना पद्मश्री प्रदान करण्यात येत आहे. पद्म पुरस्कार विजेत्यांमध्ये २३ महिलांचा समावेश आहे.







# हेरिटेज दर्जा कायम ठेवून बीजे वैद्यकीय महाविद्यालयाच्या ऑडिटोरियमचा पुर्नविकास करावा : उपमुख्यमंत्री अजित पवार

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २८ :



पुण्यातील बी. जे.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय हे स्वातंत्र्यापूर्वीपासूनचे राज्यातील नामवंत असे शासकीय महाविद्यालय आणि रुग्णालय आहे. त्यामुळे येथील ऑडिटोरियमचा पुनर्विकास करताना त्याचा हेरिटेज दर्जा कायम राखून तो महाविद्यालयाच्या लौकिकास साजेसा व्हावा. त्यासाठी तातडीने एकात्मिक विकास आराखडा सादर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी दिले.

पुणे येथील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या ऑडिटोरियमच्या पुनर्विकासाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या मंत्रालयातील समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, बी जे वैद्यकीय महाविद्यालयात अनेक विद्यार्थी वैद्यकीय पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिक्षण घेत आहेत. येथील महात्मा गांधी सभागृहामध्ये (ऑडिटोरियम) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे विविध सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रम तसेच राज्यस्तरीय कार्यक्रम घेण्यात येतात. परंतु सद्यस्थितीत या कार्यक्रमांसाठी महात्मा गांधी सभागृहाची आसन क्षमता अपुरी पडत आहे. या सभागृहात ५०० विद्यार्थ्यांची आसनक्षमता आहे. तथापि या ठिकाणी सुमारे १,५०० विद्यार्थी शिकत आहेत. त्यामुळे या सभागृहाचा पुनर्विकास करून पंधराशे आसन क्षमतेचे सुसज्ज सभागृह निर्माण करण्यात यावे.

यावेळी हेरिटेज वास्तू विशारद आभा लांबा यांनी ऑडिटोरियमच्या पुनविकासाबाबत सादरीकरण केले. वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरातच एक हजार विद्यार्थी क्षमतेचे पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठीचे वसतिगृह बांधण्यासही या बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे बी जे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय होणार आहे. या बैठकीस नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव राजेश देशमुख, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरजकुमार, वैद्यकीय शिक्षण विभागाचे संचालक डॉ.अजय चंदनवाले, बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार, पुणे येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण उपस्थित होते तर पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी हे दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

# पर्यटकांच्या सुरक्षेसाठी 'महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल' : शंभूराज देसाई

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २८ :



पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल (पर्यटन मित्र) स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. पर्यटन क्षेत्रातील वाढत्या संधी, नैसर्गिक, सांस्कृतिक विविधतेचा विचार करता या सुरक्षा दलाच्या माध्यमातून पर्यटकांना सुरक्षित पर्यटनाचा अनुभव देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

पर्यटन मंत्री देसाई म्हणाले की, राज्यातील पर्यटन स्थळे, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा यांची माहिती पुरविणे हा या पर्यटन सुरक्षा दलाचा मुख्य उद्देश असणार आहे. १ ते ४ मे, २०२५ दरम्यान पार पडणाऱ्या सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर महोत्सवात 'महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल' प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात येणार आहे.

राज्यात येणाऱ्या पर्यटकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी, तसेच राज्यातील संस्कृती, इतिहास, पर्यटनस्थळे, कायदा, नियम, पर्यटनाविषयी आवश्यक माहिती देण्यासाठी राज्यात पर्यटन स्थळावर पर्यटकांच्या सेवेसाठी पर्यटन पोलिसांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात येणार आहे. यासाठी राज्य सुरक्षा मंडळाने व मेस्कोने त्यांच्याकडे असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती लवकरात लवकर सादर करण्याचे निर्देश पर्यटन विभागाने दिले आहेत. पर्यटन पोलीस या संकल्पनेमुळे पर्यटन स्थळावरील शाश्वत पर्यटन पद्धती टिकवून ठेवण्यासाठी व शाश्वत पर्यटनच्या संवर्धनासाठी प्रयत्न करतील.

पर्यटन मंत्री देसाई म्हणाले की, पर्यटन सुरक्षा दलाच्या नव्याने सुरूवातीमुळे राज्यातील पर्यटनाला नवसंजीवनी मिळेल. हे दल पर्यटकांच्या सुरक्षेसाठी तैनात असेल, ज्यामुळे देश-विदेशातील पर्यटकांचा विश्वास वाढेल. स्थानिक ठिकाणी रोजगाराच्या संधी निर्माण होतील. दलातील कर्मचारी विशेष प्रशिक्षण घेतील, जेणेकरून ते पर्यटकांना मार्गदर्शन आणि संरक्षण देऊ शकतील. पर्यटन स्थळांवर सीसीटीव्ही, हेल्पलाईन आणि तत्काळ प्रतिसाद यंत्रणा यासारख्या सुविधा उपलब्ध होतील.

प्रधान सचिव अतुल पाटणे म्हणाले की, पर्यटकांसाठी सुरक्षाकवच निर्माण करण्याच्या दृष्टीने पर्यटन विभागाचे हे पाऊल अत्यंत सकारात्मक आहे. यामुळे पर्यटनस्थळांवर विश्वासार्ह वातावरण निर्माण होईल. तसेच पर्यटकांचा पर्यटनाकडे ओघ वाढेल आणि स्थानिक समुदायांना आर्थिक लाभ मिळेल. दलामध्ये प्रशिक्षित कर्मचारी, आधुनिक तंत्रज्ञान आणि समन्वित यंत्रणा असेल, जी आपत्कालीन परिस्थितीत त्वरित कारवाई करेल. पर्यटकांसाठी हेल्पलाइन, माहिती केंद्र आणि डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे सुलभ सेवा उपलब्ध होतील. याशिवाय, स्थानिक पोलिस आणि प्रशासनाशी समन्वय साधून सुरक्षा व्यवस्था बळकट केली जाईल. पर्यटन विभाग पर्यटकांच्या गरजा समजून त्यांच्या अपेक्षांनुसार सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहे. या उपक्रमामुळे महाराष्ट्र पर्यटनाच्या जागतिक नकाशावर आणखी मजबूत होईल. १ ते ४ मे २०२५ दरम्यान पार पडणाऱ्या महाबळेश्वर महोत्सवात महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल प्रायोगिक तत्त्वावर कार्यान्वित होणार आहे. सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून २५ जवानांची नियुक्ती करण्यात येईल. या जवानांना पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आणि महोत्सवाच्या नियोजनानुसार आवश्यक प्रशिक्षण देण्यात येईल. हे दल २५ एप्रिल ते ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत कार्यरत राहील. या दलासाठी आवश्यक वाहन व्यवस्था आणि अन्य सुविधा पुरविल्या जातील. जवानांकडून योग्य कर्तव्ये पार पाडण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती सातारा जिल्हा पोलीस अधीक्षकांकडून केली जाईल. या उपक्रमासाठी होणारा खर्च महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ आणि सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय यांच्याशी समन्वय साधून अदा केला जाईल.

# संग्राम थोपटेंच्या भाजप प्रवेशाने बारामतीत सुप्रिया सुळेंची कोंडी

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २८ :



पुणे जिल्ह्यातील बारामती लोकसभा मतदारसंघात राजकीय समीकरणे बदलताना दिसत आहेत. भोर विधानसभा मतदारसंघाचे माजी काँग्रेस आमदार संग्राम थोपटे यांनी अलीकडेच भारतीय जनता पक्षात (भाजप) प्रवेश केला आहे. या पक्षांतराने खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पुढे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने बारामतीत सुप्रिया सुळेंची राजकीय कोंडी करण्याचा डाव खेळल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली आहे.

बारामती लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा मतदारसंघ येतातः बारामती, इंदापूर, दौंड, पुरंदर, भोर आणि खडकवासला. सध्या यापैकी एकाही मतदारसंघात महाविकास आघाडीचा (मविआ) आमदार नाही. राष्ट्रवादी (अजित पवार गट) चे तीन आमदार (अजित पवार-बारामती, दत्तात्रय भरणे-इंदापूर, दिलीप मोहिते-पाटील-खडकवासला), भाजपचे दोन आमदार (राहुल कुल-दौंड, भीमराव तापकीर-खडकवासला) आणि शिवसेनेचा एक आमदार (संजय जगताप-पुरंदर) आहे. संग्राम थोपटे यांच्या भाजप प्रवेशाने मविआची ताकद आणखी कमजोर झाली आहे.

थोपटे यांचा भोरमध्ये जनाधार आहे. त्यांचे वडील अनंतराव थोपटे यांनीही हा मतदारसंघ नऊ वेळा जिंकला होता. त्यांच्या पक्षांतरामुळे स्थानिक पातळीवर सुप्रिया सुळेंची पकड कमकुवत होऊ शकते, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळे यांनी सुनेत्रा पवार यांचा पराभव केला खरा, पण विधानसभा मतदारसंघातील पक्षीय बलाबल त्यांचा गड अवघड असल्याचे दर्शवते.

भाजप आणि अजित पवार गटाने बारामतीवर लक्ष केंद्रित केले आहे. थोपटेंच्या प्रवेशाने स्थानिक निवडणुकीत भाजपला फायदा होऊ शकतो. सुप्रिया सुळे यांच्यासमोर आता मतदारसंघातील प्रभाव टिकवण्याचे आव्हान आहे. येत्या काळात त्या कशी रणनीती आखतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# सायबर साक्षरतेचा एक लाखाचा टप्पा पार

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २८ :

सायबर साक्षरता वाढवण्यासाठी मुंबई रेल्वे पोलिसांकडून विशेष मोहीम राबवण्यात येत असून त्या अंतर्गत एक लाखाहून अधिक व्यक्तींना सायबर साक्षर करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत सायबर फसवणुकीचा प्रकार, त्यांची फसवणुकीची पद्धत, त्यापासून कसे वाचता येईल, फसवणूक झाल्यास काय करावे, या माहितीचे संकलन करून एक अभ्यासक्रम तयार करण्यात आला होता.

ही परीक्षा देणाऱ्या मुंबई व परिसरातील ४० महाविद्यालयातील पाच हजार विद्यार्थ्यांचा सायबर व कायदा साक्षरता संघ स्थापन करण्यात आला होता. त्यांच्या माध्यमातून एक लाख व्यक्तींना सायबर साक्षर करण्यात आले आहेत.

माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या विस्तारासोबत सायबर फसवणुकीच्या प्रमाणातही वाढ झाली आहे. सायबर फसवणूक व कायद्यातीन बदलांबाबत जनजागृती करण्यासाठी रेल्वे पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांच्या संकल्पनेतून सायबर व कायदा साक्षरता मोहीम सुरू करण्यात आली आहे. त्या अंतर्गत सायबर व कायदा साक्षरता संघ स्थापन करण्यात आला. त्यात मुंबई व परिसरातील ४० महाविद्यालयांमधील पाच हजार विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेचे धडे घेतले. त्यासाठी पुस्तिका तयार करण्यात आल्या आहेत.

# विविध खेळांची विनामूल्य उन्हाळी प्रशिक्षण शिबिरे

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २८ :

मुंबई उपनगर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व विविध क्रीडा संस्थांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ एप्रिल ते ९ मे २०२५ या कालावधीत विविध खेळांची विनामूल्य उन्हाळी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात आली. या उपक्रमामध्ये हँडबॉल, बास्केटबॉल, वुशू, पॉवरलिफ्टिंग, वेटलिफ्टिंग आणि फुटबॉल या खेळांचा समावेश आहे. जास्तीत जास्त खेळाडूंनी यात सहभाग घ्यावा असे आवाहन मुंबई उपनगराच्या जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे यांनी केले आहे. बास्केटबॉलः जिकेपी बास्केटबॉल कोर्ट, आचार्य अत्रे मैदान, पंतनगर, घाटकोपर येथे सायंकाळी ४.४५ ते ६.०० हँडबॉलः विभागीय क्रीडा संकुल, चिकूवाडी, मुंबई पब्लिक स्कूलसमोर, सायंकाळी ४ ते ६ फुटबॉलः होली पब्लिक स्कूल, अंधेरी येथे सायंकाळी ४ ते ६ पॉवरलिफ्टिंग व वेटलिफ्टिंगः फिटनेस पॉईंट जिम, भांडूप पश्चिम येथे दुपारी ३ ते ६ वुशूः श्री नारायण गुरु हायस्कूल, शिबिरात सहभागी होणाऱ्या खेळाडूंना जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर, भक्ती आंब्रे यांच्या हस्ते गौरवण्यात येणार आहे.

# नारायण राणे-रामदास कदम वाद दुसऱ्या पिढीत

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २८ :



कोकणातील राजकीय मैदानात नारायण राणे आणि रामदास कदम यांच्यातील दीर्घकाळचा राजकीय संघर्ष आता दुसऱ्या पिढीत पोहोचला आहे. दापोली येथील धार्मिक तेढमुळे झालेल्या दगडफेक प्रकरणाने भाजपचे कॅबिनेट मंत्री नितेश राणे आणि शिंदे गटाचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यातील वाद चव्हाट्यावर आला आहे. या प्रकरणाने महायुतीतील अंतर्गत तणाव उघड झाला असून, दोन्ही नेत्यांमधील शाब्दिक चकमक राजकीय वतुर्ळात चचेर्चा विषय ठरली आहे. दापोलीत दोन गटांमध्ये धार्मिक तेढ निर्माण होऊन दगडफेक झाली. या प्रकरणावरून नितेश राणे यांनी थेट दापोलीत जाऊन गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यावर नाव न घेता जोरदार हल्ला चढवला. दगडफेक प्रकरणातील मुख्य आरोपीला योगेश कदम यांनी संरक्षण दिल्याचा गंभीर आरोप राणे यांनी केला. गृहमंत्री खातं आमच्या देवेंद्र फडणवीसांकडे आहे. कोण असेल वाचवणारे, कुठे बसलेले आहे, ते फडणवीसांपेक्षा मोठे नाहीत, असा इशारा राणे यांनी दिला. उद्या फडणवीसांकडे हा विषय गेला, तेव्हा जे वाचवायला फोन करत होते, ते सगळे फोन बंद करतील, असेही त्यांनी सूचकपणे म्हटले. नितेश राणेंच्या आरोपांनी संतापलेल्या योगेश कदमांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले. माझ्या मतदारसंघात येऊन मला शहाणपणा शिकवण्याची गरज नाही. माझा मतदारसंघ शांत कसा ठेवायचा, हे मला समजतं, असे त्यांनी ठणकावले. आपल्या शिवसेना निष्ठेवर भर देत कदम म्हणाले, आम्ही जन्मापासून शिवसेनेत आहोत. बाळासाहेबांचे बाळकडू आम्हाला मिळाले आहे. आमच्या हातातला भगवा झेंडा कधी खाली पडला नाही आणि उद्याही पडणार नाही. राणेंच्या टीकेला प्रत्युत्तर देताना त्यांनी थेट आव्हान दिले.

# कोल्हापुरातून खंडणीखोर अटकेत

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २८ :

पुणे जिल्ह्यातील तळेगाव एमआयडीसी परिसरात राहणाऱ्या एका महिलेस अनोळखी व्यक्तीने अज्ञात क्रमांकावरुन फोन करुन त्यांच्या पतीचा खून पैशांसाठी झाला तसाच तुमच्या मुलास त्रास दिला जाईल अशी धमकी देऊन 10 लाख रुपयांची खंडणीची मागणी केली होती. या प्रकरणी तळेगाव एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल करुन खंडणी विरोधी पथकाने तपास सुरु केला असता, सदर गुन्ह्यात चोरीचा मोबाईल व सीमकार्ड वापरल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला कोल्हापुरातून बेड्या ठोकल्या. तसेच त्याच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेले दोन मोबाईल व तीन सिमकार्ड जप्त करुन गंभीर गुन्हा उघडकीस आणला, अशी माहिती पिंपरी चिंचवड गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी सोमवारी दिली.

पार्थ किरण काकडे (वय-23,रा. कुडचे मळा, इचलकरंजी, जि.कोल्हापूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून तो गवंडीकाम करत आहे. खंडणी विरोधी पथकाचे व पोनि देवेंद्र चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाने आरोपी वापरत असलेले मोबाईल नंबरचे खंडणी विरोधी पथकाचे पोउपनि सुनील भदाणे, सपोउपनि सुनील कानगुडे यांनी तांत्रिक विश्लेषण करुन आरोपीचा शोध घेण्यासाठी तपास पथक कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी येथे रवाना झाले. त्यावेळी संबंधित मोबाईल क्रमांकावरुन आरोपीचा शोध घेताना, चेतन संचय पानदरे (वय-31, रा.कुरुंडवाडी, कोल्हापूर) यांनी त्यांचा मोबाईल फोन इचलकरंजीतून चोरी झाल्याचे सांगितले व त्यांनी नवीन सीम विकत घेतल्याचे निष्पन्न झाले.

त्यामुळे पुन्हा संबंधित आरोपींच्या क्रमांकाचे व सदरचे सिमकार्ड वापरलेल्या मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण केले असता सदरचे सिमकार्ड हे रवीकुमार हजारी भगत (33,रा.बिहार) याचे असल्याचे निष्पन्न झाले. त्यास इचलकरंजी येथून पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याचेकडे मोबाईलबाबत चौकशी केली असता, त्याचा मोबाईल चार अनोळखी व्यक्ती घेऊन गेल्याचे त्याने सांगितले. सदर आरोपींबाबत कोणतीही माहिती नसताना, तांत्रिक विश्लेषण करुन पोलिसांनी पार्थ काकडे व ऋषिकेश वराळे यांचे नाव निष्पन्न केले. त्यानुसार पार्थ काकडे यास कामगार वसाहत इचलकरंजी येथून ताब्यात घेवून सखोल चौकशी करण्यात आली.

# दोन वेगळ्या अपघातांत दोघांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २८ :

गुलटेकडी परिसरात जुने सुरुची उपाहारगृह याठिकाणी हॉटेलमध्ये जेवणाचे पार्सल आणण्यासाठी यलप्पा अर्जुन पोटे (वय 42) हे मुलासह गेले होते. त्यांनी मुलास हॉटेलमध्ये थांबवून लघवी करण्याकरता सार्वजनिक मुतारीकडे जात असताना, डायसप्लॉटचा बाजूने लक्ष्मीनारायण चौकाकडे जाणाऱ्या भरधाव टेम्पोने त्यांना धडक दिल्याने त्यामध्ये त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचा प्रकार घडला आहे. या प्रकरणी टेम्पो (एमएच 12 जीटी 9384) चालकाविरोधात स्वारगेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मयताचा मुलगा सुमित यल्लाप्पा कोठे( वय19) पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व त्याचे वडील यलप्पा असे दोघे जेवणाचे पार्सल आणण्यासाठी हॉटेलमध्ये जात होते.

त्यावेळी तक्रारदार यांचे वडील त्यास म्हणाले की, तू पाच मिनिटे थांब, मी लघवी करून येतो असे म्हणून ते लघवी करण्याकरीता सार्वजनिक मुतारीकडे जात असताना, लक्ष्मीनारायण चौकाकडे जाणाऱ्या भरधाव टेम्पोवरील चालकाने त्याच्या ताब्यातील टेम्पो हा भरधाव चालवल्याने आणि वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून व दुसऱ्याच्या जीवितास हानी होईल अशाप्रकारे चालवून त्याच्या वडिलांना समोरासमोर धडक देऊन त्यांच्या मृत्यूस कारणीभूत झाला आहे. याबाबत पोलीस उपनिरीक्षक एन आल्हाटे पुढील तपास करत आहे.

# एलईडीद्वारे मासेमारीवर सर्व राज्यांनी बंदी घालावी : राजीव रंजन

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २८ :

केंद्रीय मत्स्यव्यवसायमंत्री राजीव रंजन यांनी सर्व सागरी किनारपट्टीच्या राज्यांना एलईडी दिव्यांचा वापर करून मासेमारी करण्यावर बंदी घालण्याचे निर्देश दिले आहेत. एलईडीद्वारे मासेमारी म्हणजे एलईडी किंवा अन्य कलाकुसरीच्या दिव्यांच्या प्रकाशाने माशांना आकर्षित करून त्यांना पकडण्याची पद्धत आहे. महाराष्ट्रात यावर आधीच बंदी आहे, आणि आता इतर राज्यांनीही याची अंमलबजावणी करावी, असे आवाहन रंजन यांनी केले.

मुंबईतील ताज हॉटेल येथे २८ एप्रिल रोजी देशातील मत्स्यव्यवसायाच्या वृद्धीसाठी आयोजित बैठकीनंतर पत्रकार परिषदेत रंजन बोलत होते. या बैठकीला महाराष्ट्राचे मत्स्यव्यवसायमंत्री नीतेश राणे यांच्यासह ९ राज्ये आणि ४ केंद्रशासित प्रदेशांचे सचिव उपस्थित होते. या राज्यांकडे सागरी किनारपट्टी आहे, जी मत्स्यव्यवसायासाठी महत्त्वाची आहे. पत्रकार परिषदेत राजीव रंजन यांनी भारताच्या मत्स्यव्यवसायातील प्रगतीचा आढावा घेतला. ते म्हणाले, जगात मत्स्यव्यवसायात भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. गेल्या काही वर्षांत देशाच्या मत्स्य उत्पादनात दुप्पट वाढ झाली आहे. २०१४ मध्ये देशाचे मत्स्य उत्पादन ९४ लाख टन होते, तर आता ते १८४ लाख टनांवर पोहोचले आहे. तसेच, २०१४ मध्ये ३० हजार कोटी रुपयांची मत्स्य उत्पादने निर्यात होत होती, जी आता ६० हजार ५२३ कोटी रुपयांवर गेली आहे. यात आणखी वाढीची शक्यता आहे. रंजन यांनी मत्स्यव्यवसायाच्या विस्तारासाठी काही महत्त्वाच्या सूचना मांडल्या. ते म्हणाले, भारतात ९ राज्ये आणि ४ केंद्रशासित प्रदेशांमध्ये ११४ हजार किलोमीटरचे मत्स्य उत्पादनक्षेत्र आहे. माशांच्या प्रजननकाळात मासेमारी टाळण्यासाठी काळजी घ्यावी लागेल. निर्यात वाढवण्यासाठी मूल्यवर्धन आणि दजेर्दार वेस्टन यांवर लक्ष केंद्रित करावे लागेल. तसेच, छोट्या मासेमारांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. महाराष्ट्रात एलईडी मासेमारीवर बंदी असल्याने राज्याने याबाबत आघाडी घेतली आहे. बैठकीत महाराष्ट्राचे मत्स्यव्यवसायमंत्री नीतेश राणे यांनी राज्यातील मत्स्यव्यवसायाच्या प्रगतीबाबत माहिती दिली आणि केंद्राच्या निदेर्शांना पाठिंबा दर्शवला. केंद्रीय मत्स्यव्यवसायमंत्री राजीव रंजन यांनी एलईडी मासेमारीवरील बंदीच्या आवाहनासह मत्स्यव्यवसायाच्या शाश्वत विकासावर भर दिला.

# श्रीगुरुदेव सेवा मंडळाला गरज पुर्नबांधणीची

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या आर्त वेदनांवर फुंकर केव्हा !**

**मा**झी जयंती साजरी करु नका,भारतामध्ये येवढया मोठया समस्या,गरीबी आ वासुन उभी असतांना त्याचे निमुर्लन सोडुन माज्या जिवंतपणी माझा जन्मदिवस साजरा करणे म्हणजे माझा मृत्युदिन साजरा करणेच होय . विधायक कार्याने खेडयांची, लोकांची सेवा करा ,जनपयोगी उपक्रम राबवा हवे तर त्याला ग्रामजंयती म्हणा असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी साहित्यात लिहुन ठेवले आहे.म्हणुन 30 एप्रिल हा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा जन्मदिवस सर्वत्र ग्रामजंयती म्हणुन साजरा केल्या जातो. यावर्षी महाराजांची 116 वी जयंती व त्यांच्या गुरुकुंज आश्रमाचा 90 वा वर्धापन दिन साजरा केल्या जात असतांना श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व भगवी टोपी परिधान करुन जयगुरु करणाऱ्यांनी महाराजांची अपेक्षापुर्ती केली काय ? किंवा त्यांचे कोणते सामाजिक उपक्रम पुढे चालविले, कीती लोकांच्या जिवनात आपण बदल घडविला याचा लेखाजोखा या लेखात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी श्री गुरुदेव सेवामंडळाच्या अंतर्गत विभागांना दिशा देतांना आपली मनोभूमिका स्पष्टपणे जाहीर केली तर कधी मध्यवर्ती सभेतून ती मांडली. महाराजांनी दिलेल्या विविध सुचना व इशाऱ्यांतुन घेतलेला हा धावता आढावा. महाराजांचा सर्व भर प्रचार कार्यावर होता जगाच्या पाठीवर त्यांना आपले तत्त्वज्ञान पोहचवायचे होते. राष्ट्रसंतांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, तुम्ही माज्या तत्त्वज्ञानाचे पुजारी व्हा. माझे वाड्.मय करोडो मुखी जाऊ द्या. या साठी त्यांनी प्रचार विभाग निर्माण केला.

प्रचारक तयार केले. त्या सोबत इतर कामांसाठीही विभाग उघडले. हे त्यांचे व्यवस्थापनातला भाग होता. हे व्यवस्थापन काटेकोरपणे त्याची अंमलबजावणी व्हावी म्हणून सर्वाधिकारी पद निर्माण केले. या प्रमाणे सेवा मंडळात नियमानुसार, घटनेनुसार हे सर्व चालू असताना काही काळाने शिथिलता निर्माण झाली. चाळीस हजार शाखा कार्यरत होत्या. परंतु आज त्या हजारभर सुध्दा नाही हे संस्थेच्या मध्यवर्ती प्रतिनीधी संख्येवरुन ठळकपणे जाणवते. महाराज मध्यवर्ती प्रतीनीधी सभेत म्हणतात "आपली शेती जास्त असेल तर विकून टाका.



विभाग व्यवस्थित चालत नसेल तर तो बंद करा. पण सेवा मंडळाचा प्रचार कमी पडू देऊ नका. संपत्ती म्हणजे संस्था नव्हे विचार प्रचार हाच संस्थेचा प्राण आहे. येथील विभाग (गुरुकुंज आश्रम) हे ही आम्ही प्रचारासाठीच निर्माण केले आहे. प्रत्येक विभागात येणारा माणूस या विचाराने भारुन गेला पाहिजे. त्याचं जीवन सुसंस्कारानी भारुन गेले पाहिजे. हा आमचा मुख्य हेतू आहे. म्हणून सर्व दृष्टीने प्रचारक हा मुख्य पाया आहे.

परंतु येथे मला असे लिहीवेसे वाटते की प्रचारक म्हणून जर तुम्ही या श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून काम करीत असाल तर गेल्या पंचवीस तीस वर्षांच्या काळात या संस्थेच्या प्रचार विभागातून अथवा संस्थेकडुन कोणतेही राष्ट्रसंतांचे उपक्रम राबवले गेले नाहीत. राष्ट्रसंतांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला गेला नाही. जे सुरु आहे ते फक्त चमकोगीरीसाठी याला कारण म्हणजे या पदांवर गेल्या पंचविस वर्षापासुन तिनचारच मुख्यपदाधिकाऱ्यांनी मांडलेली वेटोळी,महाराजांनी लिहीलेल्या संविधानात संस्थेच्या कार्यकारीणी मंडळाचा कालावधी हा फक्त 1 वर्षाचा होता परंतु सत्ता भोगण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी हा कालावधी 3 वर्षाचा केला तेव्हापासुन मंडळात एकाच घराण्याचे राज्य प्रस्थापित झाले आज कोणतेच सेवा कार्य सुरु नसून सेवा मंडळ फक्त अनुदानित शाळा, महाविद्यालयामध्ये डोनेशन घेवून नोकरभरती करण्यापूरतेच उरलेले आहे. श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या संपुर्ण कार्यप्रणालीला आज साचलेपणा आला आहे. शासन अनुदान देत म्हणुन साहित्याची छपाई करणे, शासन अनुदान देते म्हणुन खानापुर्ती करण्यासाठी साहित्य संमेलन घेणे,शासन अनुदान देते म्हणुन मोठ मोठ इमारती बांधणे इत्यादी कामे स्वःच्या नावावर खपविणे सुरु आहे. वास्तविक शासनाकडुन मदत मागण्याला महाराजांचा विरोध होता. कोयना भुकंप असो अथवा युध्दनिधी असो महाराजांनी भजनाचा कार्यक्रम करुन शासनाला मदत केली.परंतु आज श्रीगुरुदेव सेवा मंडळ शासनावरच अवलंबुन आहे.ज्या शासनावर लक्ष ठेवण्याचे कार्य महाराजांना सेवा मंडळाकडुन अपेक्षित होते मग शासनकडुन मंडळाने निधी स्विकारल्यावर प्रचारक कोणत्या तोंडाने शासनावर लक्ष ठेवणार हा प्रश्न आहे. प्रचारकांनी आपल्या नावासमोर महंत,बुवा,महाराज अश्या सांप्रदायिक उपाध्या लावण्यास मनाई केली तसे लिहुन ठेवले असंताना संस्थेचा प्रचारप्रमुख,कार्यकर्ते, प्रचारक आपल्या नावासमोर अमुक महाराज तमुक महाराज अश्या उपाध्या मिरवित असल्याने यांची खरेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांवर श्रध्दा असेल काय यात शंकाच आहे.

**याबाबत महाराज म्हणतात,**

मै नहीं चाहता की?, सेवा मंडल में किसी भी सेवक प्रचारक या कार्यवाहको के सामने महाराज, बुवा, महंत आदि सभी सांप्रदायिक उपाधियाँ लगे। जिससे कि सेवा मंडल में संप्रदाय का बड़ा ढोंग खड़ा होगा और और यह उंचा तत्वज्ञान पिछुड जायेगा। जिस दिन से सेवक जो आज्ञाकारी होता है, वह बिछुड़ जायेगा और झब्बु के बादशाह बनकर मंडल में नाचने लगेगे।

आज नेमके सेवा मंडळात तसेच झाले आहे सर्वत्र झबुचे बादशे पैदा झाले असुन सेवा मंडळावर मालकीहक्क गाजवितांना दिसते. महाराज आपल्या एका पत्रात म्हणता श्रीगुरुदेव सेवा मंडळ हा तुकडोजी बुवाचा मठ होवू नये. इंथ किती उत्पन्न होते हा प्रश्न नसून सेवा मंडळाचा प्रचारक भारताच्या कानाकोपऱ्यातच नव्हे तर विश्वाच्या व्यासपिठावर कसा पोहचू शकेल असा प्रयत्न झाला पाहीजे परंतु महाराजांचा हा आशावाद अजुनही फळास आलेला नाही तो त्यांच्याच स्वतःला प्रचारक म्हणविणाऱ्यांनी धुळीस मिळविला असे खेदाने म्हणावे लागते. याचमुळे आज राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा आशावाद सफल करण्यासाठी श्रीगुरुदेव सेवा मंडळाला पुर्नबांधणीची खरी गरज आहे, मोठया संख्येत तरुणांनी सेवा मंडळाचे कार्य हाती घेवुन येथला साचलेपणा स्वच्छ करण्याचा प्रयत्न करायला हवा.महाराज आपल्या आपल्या साहित्यात त्यांचा आशावाद प्रगट करतांना म्हणतात अजि संत की पूरी तपस्या, सन्त के बाद है।

**जो भक्त उनके है सही, वहि कर सकें आबाद है ।।**

म्हणुच आता जे भक्त, सेवक, प्रचारक राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ध्येवादाला, आशावादाला जागून श्रीगुरुदेव सेवा मंडळाला महाराजांच्या घटनेप्रमाणे व त्यांनी दाखविलेल्या मार्गाप्रमाणे पुढे नेतिल तेच खरे महाराजांचे संगीसाथी ठरतील.

**रुपराव वाघ,**
**माजी उपसर्वाधिकारी**
**अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळ,**
**गुरुकुंज आश्रम मोबाईल-9665009880**

# उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा) महाराष्ट्र, राज्य, अनुसूचित जाती जमाती आयोग धर्मपाल मेश्राम यांचा जिल्हा दौरा

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा, दि. २८ एप्रिल :**
उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा) महाराष्ट्र, राज्य, अनुसूचित जाती जमाती आयोग धर्मपाल मेश्राम हे दि.२९ एप्रिल, २०२५ रोजी भंडारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा पुढील प्रमाणे आहे. सकाळी ०९.०० वाजता नागपूर येथून शासकीय वाहनाने भंडाराकडे प्रयाण करतील.

सकाळी १०.३० वाजता शासकीय विश्रामगृह भंडारा येथे आगमान, त्यानंतर सकाळी ११.०० वाजता मुख्याधिकारी, नगरपरिषद भंडारा यांचे सोबत आढावा बैठक व चर्चा करतील.व दुपारी १२.०० वाजता मुख्याधिकारी साकोली नगरपरिषद, यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी, भेटी व तपासणी, दुपारी १.०० वाजता मुख्याधिकारी, नगरपरिषद साकोली यांचे सोबत आढावा बैठक व चर्चा करतील.

यानंतर दुपारी २.०० ते ३ वाजेपर्यंत राखीव .त्यानंतर दुपारी ३.०० वाजता मुख्याधिकारी, नगरपरिषद तुमसर यांचे सोबत आढावा बैठक व चर्चा करतील. सांयकाळी सोईनुसार भंडारा येथून शासकीय वाहनाने नागपूरकडे प्रयाण करतील.



# प्रथम सेवा हक्क दिन साजरा

## जिल्हाधिकारी - नागरिकांना सेवा ऑनलाईन दया

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा, दि. २८ एप्रिल :**
महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत सध्या हजार पेक्षा जास्त सेवा या कायद्याच्या अंतर्गत अधिसूचित केल्या आहेत. जवळपास ५८३ सेवा ऑनलाइन दिलेल्या आहेत. अजून ३०० सेवा या ऑनलाइन आणायच्या आहेत तर १२५ सेवा ऑनलाइन आहेत पण त्या कॉमन पोर्टलवर उपलब्ध नाहीत आणि म्हणून शासनाच्या सर्व विभागांच्या १५ ऑगस्ट पर्यंत सर्व सेवा ऑनलाईन करण्यात येणार आहेत.

भंडारा जिल्हयातही याची या अधिनियमाची प्रभावी अंमल बजावणी करावी असे जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते यांनी आज सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात आयोजित महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीची 'दशकपूर्ती' आणि 'प्रथम सेवा हक्क दिन' निमित्त जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात ते बोलत होते.यावेळी व्यासपिठावर निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, अतिरीक्त पोलीस अधिक्षक इश्वर कातकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी उमेश नंदागवळी, मुख्याधिकारी करणकुमार चव्हाण उपस्थित होते.

यावेळी सेवा हक्क अधिनियमांतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या उपविभागीय अधिकारी साकोली, अश्विनी मांजे व साकोली तहसीलदार निलेश कदम यांना सन्मानित करण्यात आले.तसेच सेवा हक्क अधिनियमातंर्गत शपथ घेण्यात आली. तसेच सेवा हक्क दिन अंतर्गत



प्रातिनीधीक स्वरूपात लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

यावेळी सह्याद्री अतिथीगृह येथून झालेल्या राज्य स्तरीय कार्यक्रमात भंडारा जिल्हा प्रशासन ऑनलाईन सहभागी झाले होते.

या राज्यस्तरीय कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.यावेळी या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माहिती व तंत्रज्ञान मंत्री अँड आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव, ब्रँड अँबेसिडर पद्मश्री शंकर महादेवन, सोनाली कुलकर्णी, माजी राज्य सेवा हक्क मुख्य आयुक्त स्वाधीन क्षत्रीय, राज्य सेवा हक्क कोकणचे आयुक्त बलदेव सिंह, पुणेचे राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त दिलीप शिंदे यासह प्रशासनातील ज्येष्ठ वरिष्ठ सनदी अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# आमदार नानाभाऊ पटोले यांच्या जनसंपर्क कार्यालयात आढावा बैठक



**महासागर प्रतिनिधी**
**साकोली दि. २८ एप्रिल:**
नानाभाऊ पटोले आमदार साकोली विधानसभा यांच्या जनसंपर्क कार्यालयात साकोली तालुका कॉँग्रेस कमिटीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीत तालुक्यातील संघटनात्मक कार्याचा आढावा घेण्यात आला.

बैठकीमध्ये सर्व पदाधिकाऱ्यांनी आपापल्या क्षेत्रातील कामकाजाचा आढावा सादर केला तसेच संघटनेच्या बळकटीकरणासाठी नवीन उपक्रम आणि कार्यपद्धती यावर मंथन झाले. येणाऱ्या काळात पक्षाच्या मजबुतीसाठी ठोस कृती आराखडा ठरविण्यात आला.

याप्रसंगी तालुक्यातील सर्व प्रमुख कार्यकर्ते, महिला आघाडी, युवक कॉँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## फार्मसी महाविद्यालयात ऑनलाईन सेमिनार

**महासागर प्रतिनिधी**
**साकोली, दि. २८ एप्रिल :**
वैनगंगा बहुउद्देशीय विकास संस्था द्वारा संचलित, बाजीरावजी करंजेकर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात एक दिवसीय ऑनलाईन सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राईट डे या विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. पुणे येथील मुख्य अभियंता प्रियंका रामटेके या ऑनलाइन सेमीनारमध्ये सहभागी झालेल्या होत्या. त्यांनी विस्तृत असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. सेमिनारच्या व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य आतिश शहारे होते. सेमिनारचे आयोजक म्हणून प्रा. अविनाश मस्के, प्रा. चित्रांगणा यांनी महत्वपूर्ण भूमिका पार पाडली. याप्रसंगी प्रा. आतिश शहारे यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. चंद्रशेखर चकोले, संचालन पूजा देशपांडे तर आभार प्रदर्शन प्रा. भोजराज सातपुते यांनी मानले. या कार्यक्रमाला सहकार्य करण्यासाठी प्रा रुपेंद्र मोटघरे यांचे सहकार्य लाभले.

# लोकशाहीचा चौथा आधार स्तंभ जिवंत ठेवा: राजू बोरकर

**महासागर प्रतिनिधी**
**लाखांदूर, दि. २८एप्रिल :**
दिनांक २७/ ४/ २५ रोजी नागपूर येथील रवी भवानी येथे आयोजित केलेल्या पुरस्कार सोहळ्यात कवी तथा कथाकार आणि महाराष्ट्राच्या अनेक दैनिकांमधून सातत्याने विविध विषयावर भाष्य करणारे लेखक राजू बोरकर यांना संदेश आनंद वृत्त समूहा तर्फे तसेच मित्र परिवारातर्फे साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी या सन्मान सोहळ्यात अनेक मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. सन्मान सोहळ्यात साहित्यिक म्हणून राजू बोरकर पत्रकारिता या विषयाशी संबंधित मत व्यक्त करताना म्हणाले की, वृत्तपत्र हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून ते लोकशाही मजबूत करण्यासाठी एक महत्त्वाचं साधन आहे.

उपस्थित अनेक क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचा येथे सत्कार झाला आहे.

तसेच लोकशाहीचा हा स्तंभ मजबूत करणाऱ्या अनेक पत्रकार आणि संपादकांचा येथे सत्कार



करण्यात आला. विदर्भाच्या अनेक ठिकाणाहून आलेल्या त्या सर्व पत्रकार मित्रांचं आणि विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या अनेक मान्यवरांचं मी येथे स्वागत करतो. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी वृत्तपत्र आणि पत्रकार तसेच संपादक यांचा फार मोठा वाटा आहे.

परंतु हास्य जत्रेच्या एका कार्यक्रमात श्रमेश बेटकर या लेखकाने असं लिहिलंय, की काही कारणाने येथील पत्रकारिता गाडली गेली आणि हजारो वर्षीनी उत्खनन झालं तर तर पत्रकारितेचा शोध हा अगदी शेवटून लागेल. शेवटच्या स्तराला लागेल .

कारण येथील पत्रकारिता ही तेवढ्याच खालच्या स्तराला गेलेली आहे. लेखक विनोद वीर श्रमेश बेटकर च्या मताशी मी सहमत आहे. सध्या पत्रकारिता आणि संपादक मंडळ विकले गेले असल्याचं सर्वत्र बोललं जात आहे. वृत्तपत्रकारिता ही विकली गेली असा आरोप होतो आहे. पत्रकारिता ही राजकारण्यांची बटीक झाली आहे असा आरोप होतो आहे. आणि हा आरोप काही अंशी खरा आहे. तरीही येथे ज्या पत्रकार मित्रांचा सन्मान झाला ते प्रमाणिक पत्रकार आहेत. आणि सामाजिक जाणीवेचे भान असलेले पत्रकार आहेत. त्यामुळे येथे लोकशाही जिवंत ठेवण्याची जबाबदारी आजच्या सन्मानित झालेल्या सर्व व्यक्तींच्या खांद्यावर येऊन पडलेली आहे. जबाबदारी आपण सर्व मान्यवर मिळून पार पडणार आहात. एकीकडे आरोपांच्या फैरी असल्या तरी दुसरीकडे सन्मान होण्यापर्यंत आपल्या पत्रकारितेशी प्रामाणिक राहणारे पत्रकार बंधू असल्यामुळे लोकशाहीचा हा चौथा स्तंभ आणखी मजबूत होईल अशी मला आशा वाटते. यावेळी अध्यक्षस्थानी पत्रकार तसेच दलित साहित्यिक आंबेडकरी चळवळीतील वजनदार व्यक्तिमत्व म्हणून ज्यांच्याकडे पाहिला जातं ते प्रारंजीत मेश्राम होते. दरम्यान समाजसेविका संगीता चव्हाण, नीलिमा बावणे, प्रसिद्ध साहित्यिक राजू बोरकर, सामाजिक कार्यकर्ते अरविंद धारगावे, सुहास शेंडे, पत्रकार सुधीर शेंडे, कमलेश बोरकर, अँड. अंबादे, चंद्रशेखर अरगुलेवार, अनुप भार्गव, भोजराज नागपुरे यांचा शाल, पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संपादक मिलिंद पवणीपगार, संचालन संपादक मनोहर मेश्राम यांनी तर आभार प्रदर्शन अरविंद धारगावे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जेष्ठ समाजसेवक पुरुष पंडागळे, संपादक महादेव सिरसाट, अविनाश मेश्राम, राहुल तामगाडगे, किशोर शहारे, प्रमोद चिंचखेडे, रवा पोतारे, सुभाष यांनी अथक परिश्रम घेतले.कार्यक्रमात विदर्भातील शेकडो पत्रकारांची उपस्थिती होती.

# पंचायत राज व्यवस्था

'पंचायत राज व्यवस्था' ही अत्यंत महत्वाची संकल्पना म. गांधीजींच्या विचारात होती. त्यांच्या मते भारताचे खरे स्वातंत्र्य आणि विकास गावामधूनच शक्य आहे व गाव हीच मूलभूत प्रशासन एकक असायला हवी. ग्रामस्वराज्याचा गावकऱ्यांनी आत्मनिर्भर बनून आपले निर्णय स्वतः घ्यावेत व सरकारची मदत केवळ पूरक असावी. लोकशाही ही ग्रामपातळीवरून सुरूवात होऊन वरच्या स्तरापर्यंत पोहचली पाहिजे. व ग्रामसभा ही लोकशक्तीचे केंद्र असली पाहीजे.

लोकशाहीचे खरे रूप पंचायत राज व्यवस्थेमध्ये दिसून येते. थेट निवडणूकीद्वारे आपला प्रतिनिधी निवडून ग्राम विकासात सहभाग स्थानिक समस्या, गरजा, व त्यावरील उपाय हे ग्रामसभेच्या माध्यमांतून सोडवून गावातील लोक या ग्रामविकासाच्या प्रक्रियेत आपला सहभाग नोंदवताना दिसतात.

गावपातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच पंचायत राज व्यवस्था १९९२ साली ७३ व्या घटनादुरूस्तीनंतर या त्रिस्तरीय व्यवस्थेत घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. व गांधीजींचे ग्रामस्वराज्याची संकल्पना सत्यांत उतरवण्यात आली.

गाव, तालुका व जिल्हा पातळीवर सामान्य नागरीकांना स्थानिक निणऱ्य प्राकियेत थेट सहभाग नोंदवणे सोपे झाले.

या त्रिस्तरीय व्यवस्थेमुळे गरिब, मागासवर्गीय, महिला व अल्पसंख्यांकांना राजकारणात सहजतेने आपले योगदान देणे शक्य झाले. यामुळे समानसंधी, समान हक्क, व जबाबदारी तसेच राज्यकारभाराला पारदर्शकता या मुल्यांचा प्रसार झाला.

गावपातळीवरील स्वशासन व्यवस्था म्हणजेच पंचायतराज व्यवस्था होय. यामुळे लोकशाहीसाठी आवश्यक असलेले सत्तेचे विकेंद्रिकरण होऊन गावागावात लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थ आपल्या भागाचा विकास कसा होईल यासाठी एकजुटीने काम करताना दिसतात.

पंचायतराज व्यवस्थेमुळे खास करून महिलांना प्राधान्याने राजकारणात संधी मिळाल्याने त्यांना गाव कारभारांच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी होता आले. सदस्य, सरपंच, उपसरपंच, सभापती अशा भूमिका स्विकारल्यामुळे त्यांच्यातील आत्मविश्वास व नेतृत्वगुण वाढू लागले.

खरे पाहता आरोग्य, पाणी प्रश्न, बालकांचे प्रश्न हे यांची खरी जाणीव नक्कीच महिलांना जास्त प्रमाणात असते. त्यांच्या सहभागामुळे गावातील हे प्रश्न सहजतेने मांडणे व सोडवणे शक्य झाले आहे.

लोकशाही प्रक्रियेला चालना देणाऱ्या या शासन प्रणालीमुळे लोकांच्या हक्कांना व स्वातंत्र्याला महत्व मिळून लोकसहभागातून ग्राम, तालुका व जिल्हा पातळीवरील विकास शक्य झाला आहे.

देशात सामाजिक, आर्थिक व राजकीय पातळीवर ग्रामीण भारताच्या विकासासाठी एक मोठे प्रगतीचे पाऊल ठरलेली व्यवस्था म्हणजे त्रिस्तरीय पंचायत व्यवस्था होय. यामुळे अनेक सामाजिक राजकीय नेतृत्व गावपातळीवर देखील तयार झाले.

सामाजिक कार्याच्या क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री मिळवलेले श्री. पोपटराव पवार हे महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्हयातील हिवरे बाजार या ग्रामपंचायतीचे शेतकरी सरपंच यांच्या नेतृत्वासाठी हिवरे बाजार या दुष्काळग्रस्त व गरीब गावाचा चेहरामोहरा बदलून एक समृद्ध, स्वयंपूर्ण, पर्यावरणपुरक व आत्मनिर्भर गावाचा आदर्श देशासमोर आला. शेती व आर्थिक विकास, सामाजिक सुधारणांचे उपक्रम, जलसंधारण व जलव्यवस्थापन तसेच पर्यावरणीय सुधारणा गाव पातळीवरच गावातील लोकांच्या सहभागाने करून विकासाचे नवे Model आपल्यासमोर यशस्वी करून दाखविले.

ग्रामपंचायतीपासून सुरूवात करून नंतर सामाजिक चळवळींमध्ये अग्रणी भूमीका घेणाऱ्या माहितीचा अधिकार (RTI) चळवळीत महत्वाची भूमीका मांडणाऱ्या 'अरूणा रॉय' राजस्थानामधील लहानशा गावातील सरपंच 'राजलक्ष्मी' यांनी पारंपारिक विरोध असुनही गावात शिक्षण, पाणी आणि आरोग्याच्या क्षेत्रात कांती घडवली.

महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसांचे नेते म्हणून ओळखली जाणारे, अनोखी कार्यपद्धती, राजकीय दूरदृष्टी सर्वपक्षीय सुसंवाद ठेवणारे, ग्रामीण भागातील नेतृत्व दिल्लीत पोहचवणारे मराठवाडयाचे विकास पुरूष म्हणुन ओळखले जाणारे माजी मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांचा सार्वजनिक, सामाजिक, राजकीय जीवनाचा प्रवास हा अगदी ग्रामपंचायतीपासून झाला होता.

अशी अनेक उदाहरणे देता येतील ज्यांना स्थानिक पातळीवर कामाची संधी मिळाल्याने त्यांनी राज्य तसेच केंद्रिय पातळी देखील आपल्या कामाचा उसा उमटविला.

पंचायत राज व्यवस्थेच्या मुळाचा शोध घेता अगदी प्राचीन काळापासून प्रचायती अस्तित्वात असल्याचे दिसते. साहजिकच त्यांचे स्वरूप आजच्या पंचायतराज व्यवस्थेपेक्षा वेगळे होते.

पंचायतराज व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी अनेक अभ्यास गट तसेच समित्यांच्या अभ्यासानंतर एल. एम. सिंघवी समितीच्या शिफारशीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक मान्यता व संरक्षण देऊन लोकांच्या प्रत्यक्ष सहभागातून भारतात लोकशाही राज्यव्यवस्था तळागाळापर्यंत रूजवण्यात यश आले ते या व्यवस्थेमुळेच.

**अँड. संज्योती पाटील**

# गोंडीटोला ग्रामपंचायत कर वसुलीत तालुक्यात अव्वल, जिल्हा परिषदेच्या सभागृहात सरपंचाचा सत्कार, सरपंच आपल्या दारी उपक्रम ठरले यशाची पायरी




**महासागर प्रतिनिधी**
**सिहोरा, दि. २८ एप्रिल :** तुमसर तालुक्यातील गोंडीटोला येथे सरपंच आपल्या दारी उपक्रमातून पाणी पट्टी कराची वसुली करण्यात आली आहे. १०० टक्के वसुली करण्यात आल्याने राष्ट्रीय पंचायत राज दिनी जिल्हा परिषदेच्या सभागृहात सरपंच शितल चिंचखेडे यांना मुख्य कार्यपालन अधिकारी मिलिंद साळवे यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले आहे. सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे.

यावेळी उपमुख्य कार्यपालन अधिकारी उमेश नंदागवली, सभापती नरेश ईश्वरकर, सभापती आनंद मलेवार, यशवंत सोनकुसरे, तथा जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक उपमुख्य कार्यपालन अधिकारी उमेश नंदागवळी, संचालन लीलाधर पटले यांनी केले. तर आभार प्रदर्शन उपमुख्य कार्यपालन अधिकारी जयप्रकाश परब यांनी केले. १२०० लोकवस्तीच्या गोंडीटोला ग्रामपंचायतमध्ये १२५ नळ कनेक्शन धारक लाभार्थी आहेत. या लाभार्थ्यांकडे पाणी पट्टी कराची मोठी थकबाकी होती. सरपंच शितल चिंचखेडे यांनी थकबाकी वसुलीसाठी सुरुवातीला वार्षिक वसुलीत ५० टक्के सूट लाभार्थ्यांना दिली. या उपक्रमात काही नळ कनेक्शन धारक सहभागी झाले. परंतु उद्दिष्ठ गाठता आले नाही. संपूर्ण नळ कनेक्शन धारक सहभागी झाले नाही. नळ पाणीपुरवठा योजना सुरळीत सुरू ठेवताना अडचणी निर्माण झालेल्या होत्या. विजेचे बिल, कर्मचाऱ्यांचे वेतन, योजनेची देखभाल आणि दुरुस्ती अशा अनेक समस्यांनी योजनेला ग्रासले होते. गावातील काही भाग टेलवर असल्याने नळ योजनेचे पाणी पोहचत नव्हते. यामुळे नळ योजनेपासून अनेक गावकरी उदासले होते. नळ योजनेचे नियमित पाणी पुरवठा आणि नागरीकांचे समस्या ऐकून घेण्यासाठी महिन्यातून एकदा सरपंच आपल्या दारी उपक्रमाची सुरुवात सरपंचानी केली. नळ कनेक्शन धारक आणि अन्य कराचे थकबाकी वसुलीसाठी सरपंच आपल्या दारी उपक्रम राबविले. नागरीकांचे दारात ग्रामपंचायत कर्मचारी राकेश गजभिये आणि पाणी पुरवठा कर्मचारी प्रशांत ऊरकुडे यांना सोबत घेतले.

नागरीकांचे दारात समस्या ऐकून घेतल्या. थकबाकी असल्याने गावाचा विकास करताना अडचणी येत असल्याचे सांगितले. गावाच्या विकासात गावकऱ्यांचा सहभाग असे पटवून दिले. नळ पाणीपुरवठा योजनेचे पाणी नागरीकांचे दारात पोहचविण्यासाठी दारातच ऑन दि स्पॉट समस्याचा निपटारा केला. गावात तीन वार्ड असल्याने स्वतंत्र वॉल देण्याचे नियोजन तयार केले. प्रत्येक नळ कनेक्शन धारकांचे दारात नळ योजनेचे पाणी पोहचले. सरपंच यांनी स्वतः सरपंच आपल्या दारी उपक्रम अंतर्गत कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन पाणी पट्टी कर, घर कर आणि अन्य कराची वसुली केली. यामुळे १०० टक्के वसुली करता आली आहे. सरपंच आपल्या दारी उपक्रम नियमित सुरू ठेवण्यात येणार आहे. दर दिवशी कर्मचारी वसुलीसाठी पुढाकार घेत असल्याने वसुलीचे उद्दिष्ट गाठता आले आहे. गोंडीटोला ग्रामपचायत तालुक्यात कर वसुलीत अव्वल ठरल्याने सन्मानित करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या सभागृहात सरपंच शितल चिंचखेडे यांना सन्मानित करण्यात आले.

### हे राबविले गावात उपक्रम

गावात अनेक उपक्रम सरपंच शितल चिंचखेडे यांनी सुरू केले. त्यात गोंडीटोला भूषण अवार्ड, लेक लाडकी सन्मान, गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी सन्मान, आजी आजोबा सन्मान, कष्टकरी महिलांचा सन्मान, आदर्श शिक्षक सन्मान, बेस्ट सदस्य सन्मान, सासरी जाणाऱ्या गावातील प्रत्येक मुलीला माहेर भेट, तरुणाचे विवाहात सप्रेम भेट, सरपंच चषक क्रिकेट प्रतियोगिता, प्रबोधनकार सन्मान, बाबा जुमदेवजी व्यसन मुक्त सन्मान, स्वच्छ्ता ठेवणाऱ्या प्रत्येकी ८ महिलांचा सन्मान, उत्कृष्ट शेतकरी सन्मान, प्रत्येक आठवड्यात शाळा आणि अंगणवाडीच्या मुलांची भेट आणि मध्यान्ह भोजनाची तपासणी, महिला मेळावे, तीन महिलांचा सन्मान, लोकसहभागातून नाल्यावर श्रमदानातून वनराई बंधारा बांधकाम, प्लास्टिक मुक्त गाव, ग्राम सुरक्षा दल गठित, घन कचरा व्यवस्थापन, नाल्याचे वेस्टेज पाणी तलावात वळविले, पाणी अडवा पाणी जिरवा उपक्रम राबविले, सारस संवर्धनासाठी तलावाचे क्षेत्र मानवी हस्तक्षेपास प्रतिबंधित केले. जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन, अनेक उपक्रम राबविले.

### रोहयोतून सारस पक्ष्याना संरक्षण देणार

गोंडीटोला गावाचे शेजारी असणाऱ्या तलावात जिल्ह्यात आढळणारे सारस पक्ष्याचे मुक्त विहार आहे. यामुळे तलाव आणि परिसर मानवी हस्तक्षेप, रासायनिक खताच्या वापरासाठी प्रतिबंधित करण्यात आले आहे. जैविक खतांचे वापरासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्यात आले आहे. उपजिल्हाधिकारी लीना फलके आणि वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली सारस संवर्धन आणि जतन करण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. तलावात रोहयोतून सारस पक्ष्यांना संरक्षण देण्यात येणार आहे. ओटे बांधकाम केले जाणार आहे.

'गावकऱ्यांचे सहभागातून गावाने यशाचे शिखर गाठले आहे. कर वसुलीत तालुक्यात अव्वल ठरल्याने सन्मान करण्यात आला आहे. हा गावकऱ्यांचा सन्मान आहे. शासनाच्या विविध योजना नागरीकांचे दारात पोहचविण्यासाठी भर देणार आहे.'

***शितल चिंचखेडे, सरपंच, गोंडीटोला***

# दशकपूर्ती महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची!

**राज्यातील नागरिकांना पारदर्शक, गतिमान व कालबध्द पध्दतीने लोकसेवा देता याव्या यासाठी शासनाने 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५' लागू केला आहे. यामुळे शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांमध्ये नागरिकांची कामे वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी निश्चित झाली आहे. हा अधिनियम २८ एप्रिल २०१५ रोजी अंमलात आला असून राज्यात हा दिवस सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीस दहा वर्षे पूर्ण झाली असून त्यानिमित्त हा विशेष लेख.**

---------------

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा कायदा राज्यातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. या कायद्याची व्याप्ती संपूर्ण राज्यभर आहे. हा अधिनियम संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार पात्र असलेल्या व्यक्ती व लोकसेवा देणारी सार्वजनिक प्राधिकरणे यांना लागू होतो. तसेच, या अधिनियमांतर्गत अधिसूचित केलेल्या सर्व सेवांसाठी हा कायदा लागू आहे.

या कायद्याचा मुख्य उद्देश हा पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम आणि वेळेत लोकसेवा पुरवणे आहे. यासोबतच, लोकसेवा देणाऱ्या सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवणे हे देखील या कायद्याचे उद्दिष्ट आहे.

एखाद्या व्यक्तीची पात्रता संबंधित कायद्यातील तरतूदीनुसार ठरविली जाते. विशेष म्हणजे, या कायद्यानुसार सार्वजनिक सेवा मिळवण्यासाठी कोणताही पात्र व्यक्ती अर्ज करु शकते. परदेशात राहणारी एखादी व्यक्ती कोणत्याही अधिसूचित सेवेसाठी पात्र असेल, तर तीदेखील या कायद्यानुसार सेवा प्राप्त करू शकते.

गेल्या दहा वर्षात १८ कोटींपेक्षा अधिक अर्जदारांनी या अधिनियमानुसार अधिसूचित सेवा मिळविल्या आहेत. आपले सरकार पोर्टल यांसारख्या उपक्रमांनी नागरिकांच्या दैनंदिन व्यवहारात सुलभता आणली आहे. सर्व विभागांच्या मिळून एक हजारपेक्षा जास्त सेवा अधिसूचित असून त्यापैकी त्यापैकी ५८३ सेवा आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन उपलब्ध आहेत. एकूण १ कोटी पेक्षा अधिक नागरिकांनी आपले सरकार पोर्टलवर रजिस्ट्रेशन केले आहे.

सेवेचा अधिकार म्हणजे सार्वजनिक प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या वेळेत लोकसेवा मिळवण्याचा हक्क. सार्वजनिक प्राधिकरणात शासनाचे विभाग, विविध सरकारी संस्था, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळणाऱ्या अशासकीय संस्था यांचा समावेश होतो. प्रत्येक सेवेसाठी कालमयार्दा निश्चित करण्यात आली आहे. या कायद्याची आणि नियमांची प्रत 'आपले सरकार' पोर्टल किंवा 'आरटीएस महाराष्ट्र' मोबाईल ॲपवरून विनामूल्य डाउनलोड करता येते.

**सार्वजनिक प्राधिकरणांची भूमिका :**

या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सार्वजनिक प्राधिकरणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अधिसूचित सेवा आणि त्यासंबंधीची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवणे हे सार्वजनिक प्राधिकरणाचे कर्तव्य आहे.

यासाठी, राजपत्रात अधिसूचना प्रकाशित करण्यात येते. सार्वजनिक प्राधिकरणाने पुरविलेल्या लोकसेवांची यादी, त्यासाठी लागणारा वेळ, विहित शुल्क, पदनिर्देशित अधिकारी आणि अपील प्राधिकाऱ्यांचे तपशील कार्यालयाच्या सूचना फलकावर आणि त्यांच्या वेबसाइटवर किंवा पोर्टलवर दर्शविण्यात येतात. ही माहिती प्रदर्शित केली नाही, तर मुख्य आयुक्त किंवा संबंधित आयुक्त स्वतः दखल घेऊन कारवाई करू शकतात.

लोकसेवा मिळवण्यासाठी आवश्यक असणारी विविध प्रमाणपत्रे, कागदपत्रे आणि प्रतिज्ञापत्रे कमी करण्यावर या कायद्यात भर देण्यात आला आहे.

**अर्ज कुठे करावा?**

लोकसेवा मिळवण्यासाठी अर्जदारास पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे, प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन किंवा 'आपले सरकार सेवा पोर्टल' वरून ऑनलाईन अर्ज करता येतो. प्रत्येक विशिष्ट सेवेसाठी अर्ज करण्याचा नमुना वेगळा असतो. अर्जाचा नमुना आणि आवश्यक कागदपत्रांची यादी संबंधित कार्यालयात, 'आपले सरकार सेवा केंद्रां'मध्ये आणि संबंधित विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असते.

**ऑनलाईन अर्ज सुविधा:**

'आपले सरकार सेवा पोर्टल' हे विविध विभागांच्या लोकसेवांसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी एक सामान्य व्यासपीठ आहे. जे नागरिक स्वतःहून अर्ज करू शकत नाहीत, त्यांच्यासाठी राज्यभरात ३२००० हून अधिक 'आपले सरकार सेवा केंद्रे' कार्यरत आहेत.

याव्यतिरिक्त, 'आरटीएस महाराष्ट्र' नावाचे मोबाईल ॲपदेखील वापरकर्त्यांसाठी मराठी आणि इंग्रजी भाषेत उपलब्ध आहे. प्रत्येक ऑनलाईन अजार्ला एक विशिष्ट ओळख क्रमांक (युनिक आयडेंटिफिकेशन नंबर मिळतो, ज्यामुळे अर्जाच्या प्रगतीचा मागोवा घेणे सोपे होते.

जर एखाद्या पात्र व्यक्तीला विहित वेळेत सेवा मिळाली नाही किंवा तिचा अर्ज फेटाळला गेला, तर ती व्यक्ती प्रथम अपील प्राधिकरणाकडे अपील करू शकते. प्रथम अपील अर्ज सेवा नाकारल्याच्या किंवा विहित कालमयार्दा संपल्याच्या दिवसापासून ३० दिवसांच्या आत दाखल करता येतो.

मात्र, जर अर्जदाराकडे वेळेत अपील न करण्याचे योग्य कारण असेल, तर प्रथम अपील प्राधिकरण विलंब माफ करून ९० दिवसांत अपील स्वीकारू शकते. अपील सुनावणीची नोटीस अर्जदाराला प्रत्यक्ष, नोंदणीकृत पोस्टाने, ईमेलद्वारे, एसएमएसद्वारे किंवा मोबाईल ॲपद्वारे दिली जाते.

**आपले सरकार सेवा केंद्र :**

'आपले सरकार सेवा केंद्रे' ही नागरिकांना सार्वजनिक सेवा मिळविण्यासाठी मदत करतात. ही केंद्रे तहसील, ग्रामपंचायती, नगरपालिका, आणि काही खाजगी ठिकाणीही उपलब्ध आहेत. ही केंद्रे आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध असलेल्या सर्व विभागांच्या सेवा पुरवतात.

**लोकसेवेत कसूर झाल्यास कारवाई**

या अधिनियमात लोकसेवा पुरविण्यात किंवा अपिलांवर निर्णय घेण्यात अधिकाऱ्यांकडून कसूर झाल्यास दंडात्मक कारवाईची स्पष्ट तरतूद आहे.

**पदनिर्देशित अधिकाऱ्यावरील दंडः**

जर पदनिर्देशित अधिकाऱ्याने विहित वेळेत योग्य कारणाशिवाय लोकसेवा दिली नाही, तर त्याच्यावर कमीतकमी ५०० ते कमाल ५ हजार रूपयांपर्यंत दंड आकारला जाऊ शकतो. प्रथम अपील प्राधिकारी सुनावणीनंतर हा दंड लावू शकतात.

वारंवार लोकसेवा देण्यात दिरंगाई झाल्यास किंवा अपील प्राधिका?याच्या निदेर्शांचे पालन न केल्यास, संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई देखील केली जाऊ शकते.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणारा आणि शासकीय कामांमध्ये पारदर्शकता आणणारा एक महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सार्वजनिक प्राधिकरणांनी आपली भूमिका योग्य प्रकारे निभावणे आवश्यक आहे. नागरिकांनी देखील आपल्या हक्कांबाबत जागरूक राहून या कायद्याचा योग्य वापर केल्यास त्यांना वेळेत आणि पारदर्शकपणे लोकसेवा मिळू शकेल.

---------------

**माहिती व जनसंपर्क**
**महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.**

●●●●●

# राजकारणाच्या जात्यात शिक्षणाचा चुरा...

सध्या देशातील व राज्यातील राजकीय वातावरण बघितले तर खुप गलिच्छ झाले आहे. राज्यकर्ते व राजकीय लोकांनी सर्वसामान्य लोकांचा विकास, शिक्षण, आरोग्य, रोजगार व देश उभारणी साठी तरुणांच्या डोक्यात सुपिक विचाराची पेरणी करून लोकशाहीला बळकट करण्याचे काम करणे आवश्यक असताना आणि आणि बहुसंख्य राजकीय लोक अल्पशिक्षित असताना हे लोक मुख्य मुद्दा बाजूला सारून, धर्म, जातीय, इतिहास यावर चुकिच्या पद्धतीने बोलुन देशातील सामाजिक वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

ज्यांना शिक्षणाचा गंधच नाही त्यांनी इतिहास व धर्मावर बोलणे म्हणजे इतिहासाची तोडफोड व धमार्ची विटंबना आहे पण हेच बहुतांश भक्तांना कळतच नाही. कधी मंदिर मशिदीच्या नावाखाली, तर कधी जाती धर्माच्या नावाखाली, तर कधी कबरीच्या नावाखाली माणसाला माणसापासून दुर करण्याचे काम सत्तेतील लोकांकडून होत असेल तर देश विकसित नाही तर उद्धस्त होत आहे असे दिसून येते.

माणसाला माणसा पासून दुर करण्यासाठी राजकीय लोक नको तो मुद्दा उकरून काढतात आणि इलेक्ट्रॉनिक स्ट्रीम मिडिया त्या मुद्दाला उचलून धरून तोच सर्वात ज्वलंत मुद्दा आहे असे दाखवून आपली लाचारी व गुलामी सिद्ध करून देतात. म्हणून भारतीय मिडीयाचे स्थान जागतिक स्तरावर कुठे आहे हे सांगण्याची गरज आहे. सत्ताधारी असो वा विरोधी असो कोणताही राजकीय नेता कधीच सर्वसामान्य मानसाच्या विकासाच्या, शिक्षणाच्या, रोजगाराच्या, आरोग्य सुविधा यावर बोलताना दिसत नाहीत आणि मिडिया ला तर या विषयावर चर्चा करायला वेळच नाही. अशा प्रकारच्या गलिच्छ राजकारणात मात्र शिक्षणाचा चुरा होत आहे.

तरुण वेगवेगळ्या दंगली मध्ये, आंदोलनामध्ये जेल मध्ये जात आहेत अधिकारी होण्याची क्षमता असलेले तरुण भिकारी होत आहे तरीही राजकीय नेत्यांना तरुणांच्या भविष्याची काळजी नाही. कारण राजकीय नेत्याच्या घरात कोणतीही समस्या नाही. नेत्याची लेकरं विदेशात जाऊन शिक्षण घेतात त्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेसह इतरही भाषा अवगत असतात परंतु सर्वसामान्य मानसाच्या शिक्षणाचा प्रश्न येतो तेव्हा भाषेवर प्रश्न चिन्ह उपस्थित करून शिक्षणाची थट्टा केली जाते.

शिक्षण मराठीत असायला पाहिजे की इंग्रजी मध्ये पाहिजे, आता तर हिंदीचा ही वाद जाणीवपूर्वक पेटवून मुळ मुद्यावरून लक्ष विचलित करण्याचे काम केले जात आहे. हिंदी भाषेविषयी सध्या प्रचंड गदारोळ सुरू आहे. या गदारोळाचा, या चचेर्चा शिक्षणावर व शिक्षणाच्या गुणवत्तेवर तिळमात्र ही फरक पडणार नाही. याचे कारण आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरू होऊन अनेक दिवस होऊन गेले. इंग्रजी शाळेच्या फि हजारो लाखों रुपये प्रतिवर्षे आहे. इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना अजून बरोबर इंग्रजी बोलता आली नाही आणि यांनी नवीन हिंदीचा मुद्दा उपस्थित करून शिक्षण क्षेत्रात स्वतः ला तज्ञ समजणारे लोक शिक्षणाची चिंधी करताना दिसत आहेत.



**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव, ता. मेहकर**
**९१३०९७९३००**

खरं तर हिंदी भाषेचा मुद्दा चचेर्चा विषयच नाही. मुळ मुद्यावरून लक्ष हटविण्यासाठी सरकारने हिंदीचा चेंडू फेकला आणि बाकीचे विरोधक त्या भोवती खेळत आहेत. ज्याला जी भाषा समजले त्या भाषेतून, ज्या भाषेचा फायदा जागतिकीकरणात टिकण्यासाठी व रोजगार निर्मिती साठी आवश्यक असेल त्या भाषेत शिक्षण द्यायला काहीच हरकत नाही. पण कोणत्याही भाषेतून शिक्षण देताना शिक्षणामध्ये गुणवत्ता पाहिजे यावर मात्र कोणीच बोलत नाही.

शिक्षणात विज्ञानवाद असावा, तर्कवाद असावा, शिक्षणात कौशल्य असावे, शिक्षणाच्या माध्यमातून रोजगार व नोकरी यावर मात्र सत्ताधारी वा विरोधक कोणीच बोलत नाही. यामुळे शिक्षणाची गुणवत्ता कमी झाली आहे. गुणवत्तेवर कोणाचेही लक्ष राहीले नाही. विज्ञानाचा शिक्षण अज्ञाना सारखे वागत आहे. काही नेते तर नालीच्या पाण्यातुन गॅस तयार करतात, एवढेच नव्हे तर गॅसच्या फुग्यात बिया टाकुन वृक्षारोपण करतात, आईच्या पोटी जन्म घेऊन आपला जन्म जैविक नाही असे म्हणतात, काही लोक प्रत्येक आजारावर गोमूत्र एकमेव उपाय आहे म्हणून गोमूत्र व शेण खाण्यापिण्याचे सल्ले देतात आणि येथील सुशिक्षित समजणारा वर्ग ते ऐकून घेत असेल तर देशात शैक्षणिक गुणवत्ता किती आहे याची जाणीव होते.

कोणताही राजकीय नेता इंग्रजी माध्यमांच्या शाळेची फी एवढी महाग कशी यावर कोणीही बोलायला तयार नाही. बऱ्याच लोकांची वर्षाची कमाई नाही तेवढी एका वषार्ची शाळेची फि आहे. इतर खर्च वेगळाच. मग सर्वसामान्य लोकांनी आपल्या मुलांना कसे शिकवायचे?

जशी आर्थिक विषमता निर्माण झाली आहे तशीच शैक्षणिक विषमता निर्माण झाली आहे. गोरगरीब लोकांची वेगळी शाळा, श्रीमंत लोकांची वेगळी शाळा असे वातावरण निर्माण केले आहे. पण गोरगरीब दोघांची मुलं एकाच छताखाली आजही का शिकत नाहीत? यावर मात्र सर्वांची चुप्पी आहे.

प्रत्येक राजकीय नेता फक्त स्वतःच्या फायद्याचे व जनतेची दिशाभूल करण्याचे राजकारण करत आहेत. परंतु यामध्ये सर्व सामान्य माणसाच्या लेकाराच्या शिक्षणाचा चुरा होत आहे. यावर मात्र कोणी बोलत नाही. मिडिया चर्चा घडवून आणत नाही. याचाच परिणाम राजकीय नेते स्वतः ची झोळी भरून जनतेला, जनतेच्या प्रश्नांना व जनतेच्या शिक्षणाला वाऱ्यावर सोडत आहे. ही खुप गंभीर बाब आहे.

शिक्षण कोणत्या भाषेत द्यायला पाहिजे या अगोदर शिक्षणात कोणकोणत्या घटकांचा समावेश पाहिजे, सर्वांना कोणत्याही शाळेत प्रवेश घेता येईल अशी फी व्यवस्था, फी भरूनही विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीस लागते कि नाही याची समीक्षा, पैशाने विकत शिक्षण घेऊनही भविष्यातील नोकरीची हमी या बाबींवर चर्चा व समीक्षा होणे आवश्यक आहे.


परंतु राजकीय नेते हे सर्व सामान्य जनतेच्या विकासाचे, कल्याणाचे राजकारण करत नाही म्हणून सर्वसामान्य लोकांचे भविष्य उद्धवस्त होऊन नको त्या विषयावर नको तेव्हा चर्चा करून चुकिची माहिती पेरण्याचे काम केले जाते. शिक्षण घेऊनही तरुण बेरोजगार म्हणून फिरत आहेत, दरवर्षी वेगवेगळ्या गुन्ह्यात हजारो तरुण जेलमध्ये जात आहेत, यावर मात्र चर्चा घडत नाही. चर्चा घडते ती जातीवर, धर्मावर, मंदिरावर, मशिदीवर परंतु झाडाला फाशी घेणाऱ्या शेतकऱ्यांवर किंवा आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे काय? भविष्यात शेतकरी आत्महत्या करणार नाहीत यावर उपाययोजना म्हणून चर्चा का होत नसेल?

प्रत्येक क्षेत्रातील लोक आत्महत्या करत आहेत परंतु राजकीय क्षेत्रातील लोक आत्महत्या हत्या का करत नाहीत यावर मात्र स्ट्रीम मिडियाला चर्चा करायला वेळच कुठे आहे? याचाच परिणाम म्हणून देशातील सर्वसामान्य जनतेच्या समस्या अधिक जटिल होत आहेत.

विद्यार्थी, सुशिक्षित तरुण यांच्या वर उपासमारीची वेळ येत आहे. मुळ समस्या बाजूला सारून सरकारचा प्रवक्ता म्हणून महत्वाची भुमिका बजावणारा मिडिया खरचं सर्वसामान्य जनतेची विद्यार्थ्यांची बाजू उचलून न्याय देईल हि अपेक्षा फोल आहे. म्हणून शिक्षण, रोजगार, कृषी प्रत्येक क्षेत्रात सर्वसामान्य लोकांचा चुरा आहे. आणि हिच लोकशाही मधील शोकांतिका आहे.

■ ■ ■

# युगपुरूषाच्या परिवर्तनाच्या प्रवासाचा साक्षीदार ठरणारा दस्ताऐवज : फुले




महात्मा जोतीराव फुले यांच्या बाबतीत सन १९२४ ते १९२७ दरम्यान पंढरीनाथ सीताराम पाटील यांनी गावागावांत फिरुन माहिती संकलित केली. त्याच्याच आधारे आचार्य प्र. के. अत्रे यांनी ३० जानेवारी १९५४ रोजी म. फुलेंवर बोलपट प्रदर्शित केला. त्याच्या प्रदर्शनाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते. त्या चित्रपटाला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला होता. त्यानंतर तब्बल ७० वषानंतर समता फिल्मस् आणि अमिता फिल्मप्रोडक्शन प्रा. लि. च्यावतीने सत्यशोधक नावाचा मराठी चित्रपट श्री. निलेश रावसाहेब जळमकर यांनी दिग्दर्शित केला.

आता २५ एप्रिल २०२५ रोजी झी स्टुडिओज प्रस्तूत डांसिंग शिवा फिल्मस् आणि किग्समेन प्रोडक्शन्स फिल्म निर्मित व राष्ट्रीय पुरस्कार विजेते अनंत नारायण महादेवन दिग्दर्शित फुले हा हिंदी चित्रपट महाराष्ट्रासह इतरही राज्यात प्रदर्शित करण्यात आला. प्रणय चौकशी, जगदिश पटेल, रितेश कुडेचा, अनुया चौहान कुडेचा, सुनील जैन, डॉ. राज खवाडे हे निर्माता तर क्रांती शानबाग, कलापी नागदा हे सहनिर्माते आहेत.

सामाजिक क्रांतिचे आद्य प्रणेते महात्मा जोतीराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षण, जाती निर्मूलन आणि सामाजिक परिवर्तनाची चळवळ ह्या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहेत. सामाजिक समतेसाठी लढणाऱ्या ह्या क्रांतिकारी दाम्पत्याच्या प्रेरणादायी जीवन कहाणीला प्रथमच हिंदी भाषेतून रुपेरी पडद्यावर मांडण्यात आले आहे, त्यामुळे आजच्या पिढीला इतिहासाची जाणीव करुन देतानाच नव्या विचारांची दारे उघडणारा हा चित्रपट ठरणारा आहे.

जोतीबांच्या भुमिकेत स्कॅम १९९२ फेम प्रतीक गांधी यांनी जीव ओतला तर सावित्रीबाईंच्या भुमिकेत अभिनेत्री पत्रलेखा यांनी समर्थपणे साथच दिली नाही, तर काही प्रसंगातून स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व समर्थपणे सिध्द केल्याचे दिसते. सावित्रीबाईंची बालपणीची भूमिका राधा धारणे ह्या बाल कलाकार मुलीने साकार करतांना अभियनाची चुणूक दाखविली.

महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांची दैन्यावस्था घालविण्यासाठी फुलशेतीला प्राधान्य दिले. त्या प्रसंगाने फुले चित्रपटाची सुरुवात करुन प्रेक्षकांना सुखद अनुभूती देण्यात आली. त्यानंतर जोतिबांचा ब्राम्हण मित्र परांजपेच्या लग्नात झालेला अपमान त्यांच्या जिव्हारी लागला, त्यातून क्रांतिकार्य गतीशील होत गेले.

शुद्रांना हात लावल्याने पाप लागते. त्यांच्या सावलीचा उच्चवर्णीयांना विटाळ होतो. मुलींना शिकवून तू क्रांती करणार? हा धर्म आणि सत्याचा मार्ग नव्हे, असे मुलगा व सुन यांना सांगतांना गोविंदराव फुले यांच्या मनातील घालमेल प्रभावीपणे दाखविण्यात आली. त्यावर फ्रान्समधील अन्याय-अत्याचार व जुल्म आणि शोषण करणारी राज्यक्रांती ही तेथील मागासवर्गीयांनी हाणून पाडली, हे जोतीरावांचे कणखर उत्तर त्यांच्या पुढील सामाजिक क्रांतीचे सुतोवाच करते.

**प्रा. श्रीकृष्ण बनसोड, समाजभूषण**
**संपादक, वऱ्हाड विकास**
**किशोर नगर,**
**अमरावती. ९७६३४०३७४८**

फुले दाम्पत्यांच्या मुलींच्या शाळेक शिकवित असतांना शिक्षिका सावित्रीबाई यांना केलेली मारहाण, शैक्षणिक साहित्याची केलेली तोडफोड, सावित्रीबाईंनी शिक्षणाच्या कायार्पासून परावृत्त व्हावे म्हणून त्यांच्यावर केलेला शेण गोळ्यांचा मारा, जोतिबांच्या खुन करण्यासाठी पाठविलेले भाडोत्री मारेकरी इ. घटनातून सामान्य माणसांना मनात चीड निर्माण होते.

वस्ताद लहुजी साळवे व मारेकरीचे केलेले मनपरिवर्तन, जोतिबांचा ह्यमहात्माह्न म्हणून केलेला गौरव इत्यादि प्रसंग हे मनाला सुखावून जातात. तेव्हा महात्मा फुले यांनी केलेल्या भाषणातून त्यांची समाजासाठी झटण्याची-झिजण्यासाठी त्यांची भूमिका ही प्रेरणा देणारी आहे. विधवा काशिबाई सह इतरही ब्राम्हण विधवांचे बाळंतपण, विधवांचे मूंडन करु नये म्हणुन नाभिकांचा संप, शूद्रांना पाण्यासाठी घरची विहीर खुली करुन देण्याच्या प्रसंगातून फुले दाम्पत्याची कणखर व करारी भुमिका दिसुन येते.

समाज व्यवस्थेवर प्रहार करतांना ह्यमग आमचा धर्म कोणता? हा प्रश्न विचारणारी चिमुरडी मुक्ता साळवे चा सत्कार करतांना मेजर कँडी यांचे, हा निबंध दलित साहित्याची सुरुवात करणारा ठरणार, हे वाक्य बरेच काही सांगुन जाते.

महात्मा फुलेंचा अर्धांगवायुमुळे उजवा हात निकामा होवू नये, डाव्या हाताने लेखन करण्यामागील त्यांची जिद्द व चिकाटी दिसुन येते. त्यांचे महानिर्वाण प्रसंगी सावित्रीबाईंनी पतीच्या चितेला भडाग्नी दिला. ही क्रांतिकारी घटना म्हणावी लागेल.

सावित्रीबाईंनी प्लेगच्या साथीत अनेक रुग्णांचे जीव वाचविले. पण त्यात त्यांचे देहावसान झाले. ह्या प्रसंगातून अंगावर काटे उभे राहिल्याशिवाय राहत नाही. महात्मा फुलेंचे मित्र उस्मान शेख, फातिमा शेख तसेच पुरोगामी ब्राम्हण मित्रांकडुन मिळालेले सहकार्य हे चित्रपटात प्रभावीपणे दाखविण्यात आले आहे.

सहकालाकार म्हणून विनय पाठक, जयेश मोरे, आकांक्षा गाडे, विशाल अर्जून, अभिनव राघव, सुरेश विश्वकर्मा, दर्शिल रुपाली सह सर्वच कलाकारांनी फुले चित्रपटाला न्याय देण्याचे केलेले प्रयत्न हे निश्चितच कौतुकास्पद आहे. साथी - साथी, हर जीवन में हम साथी ह्या गीतासोबतच पोवाडा व इतरही गीत हे श्रवणीय आहेत. महात्मा फुलेंच्या मानसिक गुलामगिरी विरुध्द लढ्याचे वास्तववादी चित्रण अनुभवण्यासाठी मिराज सिनेमा येथे जावुन तो प्रत्येकाने बघण्याची गरज आहे. हे सांगणे न लगे!

■ ■ ■

# जाई आहे एंटीऑक्सीडेंट गुणांनी पुरेपुर



आजच्या काळात एंटीबायोटिक रेसिस्टन्सची समस्या वेगाने वाढत आहे. ऑक्सीडेटीव्ह स्ट्रेस तर सर्वसामान्य गोष्ट झाली आहे. इफ्लेमेशनमुळे होणा?या आजाराचा घेरा वाढत आहे. अशात चमेली म्हणजे जाईची फुले एक अनमोल भेट आहे. यात एंटीऑक्सीडेंट क्षमता असून पतंजलीने याचे संशोधन केले आहे

आजच्या काळात माणसाला दोन मोठ्या आरोग्य समस्या निर्माण होत असतात. एक समस्या आहे औषधांच्या प्रति वाढता रेजिस्टन्स आणि दुसरा आहे ऑक्सीडेटिव्ह स्ट्रेस, हा शरीरातील फ्री रेडिकल्समुळे होते. पहीली समस्या ही आहे की अनेक बॅक्टेरिया आणि फंगसमुळे औषधांविरोधात लढणे शिकले आहे. त्यामुळे औषधांचा परीणाम शरीरावर होत नाही.

दुसरीकडे फ्री रेडिकल्समुळे आपल्या शरीरातील पेशींचे नुकसान होत आहे. त्यामुळे वाढत्या वयाने हृदयाचे आजार आणि कॅन्सरसारखे दुर्धर गंभीर आजार वाढले आहेत. या सर्व समस्यांवर सुटका मिळविण्यासाठी एंटीऑक्सीडेंट गरजेचे आहे. एलोपॅथीमध्ये अनेक औषधे आहेत. परंतू जाई फुलांमध्ये ऑक्सीडेटीव्ह स्ट्रेसला कमी करतो. यात चांगल्या प्रमाणात एंटीऑक्सीडेंट असते.

संशोधनात उघडकीस आले आहे की आयुवेर्दात उपयोगी ठरलेली चमेलीचे रोपटं एंटीबायोटिक रेजिस्टन्स आणि ऑक्सीडेटीव्ह स्ट्रेस दोन्हींशी लढू शकते. दोन्ही समस्यांतून त्यामुळे सुटका होते, चमेलीचे विविध प्रकार आहेत, जे बॅक्टीरिया, फंगस आणि फ्री रेडिकल्सपासून वाचविण्यास मदत करतात. हे औषधी रोपटे सुरक्षित आणि परिणाम कारक औषधांचा स्त्रोत होऊ शकतात.

या रोपट्यांमध्ये आढळणारी तत्वं टॅनिन्स, अल्कलॉइड्स, फिनोलिक्स आणि फ्लेवोनॉयड्स, बॅक्टीरिया आणि फंगस वर खोलवर परिणाम करतात आणि यांना नियंत्रणात आणतात. यापासून शरीराला होणारे नुकसान कमी आहे.

चमेलीच्या जगभरात सुमारे १९७ प्रजाती आहेत. आयुर्वेदात याचे औषधी गुण देखील महत्वाचे आहेत. चमेलीच्या फुलांचा वापर त्वचा रोग,पिपल्स-पुळ्या, डोळ्यांच्या समस्या बऱ्या होत्यात. त्याच्या पानांचा वापर स्तनाच्या कर्करोगासारख्या आजारांमध्ये तसेच महिलांच्या मासिक पाळीच्या अनियमिततेमध्ये ही उपयुक्त आहेत. चमेलीच्या फुलांचा सुंगध सगळ्यांना आवडतो. चमेलीच्या आयुर्वेदिक औषधी गुण तेवढेच महत्वाचे आहेत.

■ ■ ■

## वाचक लिहितात

### नंदनवनातील दहशतवादी आग

जिहादी राक्षसांनी काश्मीरात केलेले मृत्यूचे तांडव बघितले. मन सुन्न झाले. पण त्याहीपेक्षा सर्व देशातच प्रचंड संतापाची लाट उसळली. ते दहशतवादी दोन दिवस आधी येऊन राहतात, सैनिकी वेशात येऊन मृत्यूचे तांडव करतात आणि आपल्या गुप्तचर संस्थेला (कइ) सुगावाही लागत नाही. यासारखे सरकारचे भयंकर अपयश ते कोणते? नाकासमोर असलेल्या बांगलादेशात एवढा मोठा उठाव झाला, तेव्हाही भारतीय हेर खाते झोपले होते. का पोसायचे यांना? काश्मीर मधील ३७० कलम हटवले. पण काय फरक पडला? ना तिथे काश्मिरी पंडित जाऊ शकले ना कोणी भारतीय तिथे जाऊन जमीन घेऊ शकले.

मागे पुलवामा घडले आणि आता पहलगाम. देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी असलेले सैनिकच मारले जातात तिथे सामान्यांची काय कथा ! सरकार मात्र ठोस कृती करण्यापेक्षा बाता मारण्यात गुंतले आहे. जेवढी तत्परता देशाच्या आणि राज्याच्या निवडणुक प्रसंगी सरकार दाखवते, तेवढी तत्परता आणि सावधानता देशाप्रती दाखवली असती तर हे काश्मिरी हत्याकांड घडले नसते. आता काही दिवसातच अमरनाथ यात्रा आहे. त्यावरही दहशतवादाचे संकट घोंगावत राहणार. आपले परराष्ट्र धोरण अत्यंत खिळखिळे झाले आहे. केवळ परदेश दौरे करणे आणि मिठ्या मारणे म्हणजे परराष्ट्र धोरण नव्हे! त्यासाठी दूरदृष्टी, कणखरपणा, देशाप्रती, जनते प्रति प्रेम, धाडस आणि परिणामांची जाणीव ठेवून निर्णय घ्यावे लागतात.

एकीकडे चीन भारतात घुसतो आहे, तर दुसरीकडे पाकिस्तानचे जिहादी माणसांना मारत आहेत. आता वेळ आली आहे या हिरव्या आणि लाल बावट्यामध्ये भगवा फडकवण्याची ! पण त्यासाठी युद्ध हा एकमेव पर्याय नाही. कारण अविचारी पाकिस्तान अणुबॉम्ब टाकण्यास मागे पुढे पाहणार नाही आणि त्याचे दुष्परिणाम सगळ्यांनाच भोगावे लागतील. त्यासाठी पाकिस्तानची आर्थिक, राजनैतिक आणि पाणी कोंडी करून जगाला आपले म्हणणे पटवून देऊन संपूर्ण दहशतवादी तळांचा नायनाट करायला हवा. अशा परिस्थितीत पाकिस्तान कधीही युद्ध करण्याच्या मनस्थितीत राहणार नाही. दहशतवादाची ही आग इथेच विझवावी लागेल. तेव्हा आता आपली शक्ती आणि युक्ती दाखवायची वेळ आली आहे.

■ सौ.माधवी पत्की, नागपूर.

## अशोकायन



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

### कुट निती..

श्रीकृष्णाच्या कुटनितीचे
नेते देतात दाखले
मात्र यदा यदाही धर्मस्य
हा निस्वार्थ हेतू होता
हे कसे विसरले?

कुटनिती म्हणून
एकमेकांची जिरवण्यात
पक्ष आहेत मश्गुल
त्यापायी 'बहूजन हितायची'
बत्ती झालीय गुल...

## तितरमारे ठरले प्रथम लकी डिजिटल ग्राहक

**गोंदिया :** ऑनलाइन वीजबिल भरणा करणाऱ्या ग्राहकांसाठी लकी डिजिटल योजना-२०२५ सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा लकी ड्रॉ महावितरणमध्ये काढण्यात आला असून, गोंदिया शहर उपविभागामधील प्रथम पुरस्कार लालचंद तितरमारे यांना मोबाइल, द्वितीय पुरस्कार मुकेश पाटणी यांना मोबाइल, तृतीय पुरस्कार निशांत मिश्रा यांना स्मार्ट वॉच देऊन पुरस्कृत करण्यात आले.

ऑनलाइन बिल भरणे फार सोपे असते, याची माहिती व्हावी व त्यामुळे आपल्या वेळेची बचत होते व वेळेवर जर बिल भरले तर आपल्याला सूटदेखील मिळते, याचा लाभ जास्तीत जास्त लोकांनी घ्यावा या उद्देशाने महावितरणकडून ही योजना लागू करण्यात आली आहे. ज्यावेळेस अशा सर्व सोयी नव्हत्या त्यावेळेस लोकांना तासन् तास रांगेत उभे राहावे लागत होते;

पण आता डिजिटल पद्धती आल्यामुळे हे सर्व सोयीचे झाले आहे. जास्तीत जास्त लोकांनी ऑनलाइन बिल भरावे व आपला वेळ वाचवावा, या उद्देशाने ही योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेत ज्या वीज ग्राहकांनी सतत मागील १२ महिने वीजबिल ऑनलाइन भरणा केलेला आहे, अशा ग्राहकांमधून लकी ड्रॉच्या माध्यमातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे ग्राहक निवडून पुरस्कृत करण्यात आले. बक्षीस वितरण कार्यक्रमास अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रशांत टेंभेकर, शहर उपविभाग सहायक अभियंता वनश्री वैद्य, कनिष्ठ अभियंता अमन जीवतोडे, सहायक लेखापाल राहुल चोपकर यांच्यासह इतर कर्मचारी व ग्राहक उपस्थित होते.

# रोहयो कामात अवैध वाळू; गौण खनिज तस्कर मालामाल

## महसूल विभागाचे दुर्लक्ष



**देवरी :** तालुका निसर्गतः गौण खनिज संपत्तीने समृद्ध असून या तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून गौण खनिजाच्या चोरीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच तालुक्यात रोहयोची वेगवेगळी कामे जोमात सुरू आहेत. या सर्व कामांमध्ये अवैध मुरूम व रेतीचा वापर सुरू असून गौण खनिजाचे खनन जोरात सुरू आहे. मात्र, याकडे महसूल विभागाचे दुर्लक्ष होत आहे.

गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुका नक्षलग्रस्त तसेच आदिवासीबहूल म्हणून ओळखला जातो. या तालुक्याला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासन वेगवेगळया योजनांमार्फत नागरिकांचा विकासदर उंचविण्याचा प्रयत्न करीत असते. जिल्हा परिषद तसेच ग्रामपंचायत स्तरावरून तालुक्यात निरनिराळया योजना राबविल्या जातात. या योजना राबविण्यासाठी शासन भरपूर निधीची मदत करतो. राज्याच्या योजनांपैकी रोजगार हमी योजना सर्वांत मोठी योजना असून या योजनेंतर्गत रस्ते बांधकाम, खडीकरण, नाल्यांचे काम अशी अनेक कामे केली जातात. वर्तमान स्थितीत तालुक्यात रोहयोची कामे जोमात सुरू आहेत. पण या योजनेमध्ये अवैध मुरूम, रेती तसेच दगड या गौण खनिज संपत्तीपासून कित्येक रुपयांचा चुना शासनाला लावला जात आहे. परंतु, रोहयोच्या कामात वापरण्यात येत असलेले अवैध गौण खनिज तपासण्याकरिता महसूल विभागाच्या अधिकारी तसेच तलाठ्यांना वेळच नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे तस्कर व ठेकेदारांचे चांगलेच फावत असून यात शासनाच्या कोट्यवधी रूपयांच्या महसुलास चुना लावला जात आहे. विना रॉयल्टची रेती छत्तीसगडमधून येत आहे. तर वनविभागाच्या जागेतून मुरूम चोरी होत असून सर्व ठिकाणी विना रॉयल्टीचे मुरूम टाकले जात आहे. रोहयो योजनेंतर्गत खडीकरणाच्या कामात विना परवानगी मुरूमाचा वापर सर्रास तालुक्यात सुरू आहे. याकडे महसूल विभाग मात्र डोळे बंद करून आपल्या जागेवर तटस्थ उभा आहे.

### तस्करांविरोधात कारवाई होणार का?

बिनधास्त दिवसाढवळ्या मुरूम चोरी होत असून याकडे महसूल तसेच वनविभागाने पूर्णतः पाठ फिरविली आहे, असे दृश्य तालुक्यात दिसून येत आहे. हेच कारण आहे की आता अवैधरित्या रेती व मुरुमाचा वापर रोहयोच्या कामांमध्ये सुद्धा सर्रास केला जात आहे. अशा मुरूम, रेती, दगड या गौण खनिज संपत्ती तस्करांविरोधात तालुक्यातील महसूल विभाग कारवाई करेल काय? याकडे तालुकावासीयांचे लक्ष लागले आहे.

## पाणीपुरवठा नियमित करा : नागरिकांची मागणी

**आमगाव :** रखरखता मे महिना अगदी एक दिवसांवर येऊन ठेपला आहे. अशातच पाणी टंचाईचे चटके तीव्रतेने जाणवण्यास प्रारंभ झाला आहे. अनियमित पाणीपुरवठ्यामुळे घरात महिलांची तारांबळ उडत असून, शहरात नियमित आणि शुद्ध पाणीपुरवठा व्हावा, अशी अपेक्षा महिलांनी व्यक्त केली आहे.

यावर्षी उन्हाळयाला काहीसा उशीरा प्रारंभ झाला. नगर प्रशासनाने पाणीटंचाई जाणवू नये म्हणून उपाययोजनाही केल्या. आगामी प्रखर उन्हाळयाचा काळ लक्षात घेता महिला भगिनींनी आणि घरातील पुरुषांनी सुद्धा पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. घरात पाणी नसले की महिलांना मात्र खूपच जड जाते. कपडे धुणे, धुणीभांडी करणे, प्रातर्विधी आणि आंघोळ अशा दैनंदिन कामांना बरेच पाणी लागते. पाण्याशिवाय महिलांना घरात करमत नाही. शहरात गढूळ व दुषित येत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे. शहरातील काही भागात जास्त पाणीटंचाई आहे. तर दुसरीकडे ज्या भागात मोठे वजनदार, धनदांडगे, राजकारणी आणि अधिकारी यांची निवासस्थाने आहेत त्या भागात मात्र वेळच्या वेळी आणि मुबलक प्रमाणात पाणीपुरवठा केला जातो, अशीही नागरिकांची तक्रार आहे. अशा काही भागात तर पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होतो. उन्हाळयात होणाऱ्या पाण्याच्या या नासाडीला जबाबदार कोण? असा प्रश्न निर्माण होत आहे.

# १२ वर्षांपासून रखडली वाचनालयांची मंजुरी

## शासनाच्या उद्देशाला हरताळ ; जिल्ह्यात केवळ ३५ टक्केच वाचनालय सुरू



**गोंदिया :** वाचनाची आवड लागावी, त्यातून बाह्य जग आणि इतिहास कळावा हा उद्देश ठेवून वाचन संस्कृती वाढविण्यासाठी वाचनालयांची गरज आहे. त्यासाठी शासनाकडून देखील प्रोत्साहन देण्यात येते. मात्र जिल्ह्यात या धोरणाला हरताळ फासला गेला आहे. जिल्ह्यातील एकूण गावांच्या तुलनेत फक्त ३५ टक्के इतकीच वाचनालये असून नवीन वाचनालयांना गेल्या १२ वर्षांपासून मंजुरी अडकली आहे. त्यामुळे शासनाच्या उद्देशाला शासनच ठेंगा दाखवत असल्याचा प्रकार सध्यातरी सुरू आहे.

जिल्ह्यात ५४७ ग्रामपंचायतींत ११०३ महसुली गावे आहेत. कायद्यानुसार गाव तिथे ग्रंथालय असायला हवे होते. मात्र, जिल्ह्यात उपलब्ध ग्रंथालयांची टक्केवारी ३५ असून हे अल्प आहे. जिल्ह्यात अ, ब, क, ड या चार श्रेणींतील ग्रंथालयांना सरकारने मान्यता दिली आहे. श्रेणीनुसार त्यांना अनुदान दिले जाते. परंतु, जिल्ह्यातील काही ग्रंथालये कधी उघडली जात नसल्याने आपल्या गावातच ग्रंथालय आहे याची माहितीच नसल्याचे वास्तव आहे. तर, काहींनी केवळ मोठेपणा मिरविण्यासाठी ही ग्रंथालये कागदोपत्री सुरू ठेवल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे याकडे लक्ष देणार तरी कोण, असा प्रश्नही आता उपस्थित होतो आहे. तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी गाव तिथे ग्रंथालय असावे, असे मत मांडले होते. त्यामुळे वाचन संस्कृती वाढली पाहिजे यासाठी जोर देण्यात आला. परंतु, २०१२-१३ मध्येनव्या ग्रंथालयांना मान्यता देणे बंद झाले. शिवाय, या ग्रंथालयांना मिळणारे तोकडे अनुदान सहामाही मिळत असल्याने काही मोजकी ग्रंथालये वगळता इतर ग्रंथालये केवळ नावाला आहेत.

जिल्ह्यातील ११ ग्रंथालये अकार्यक्षम असून, १८२ ग्रंथालयांना निधी मिळत आहे. ग्रंथालय चालविण्यासाठी निधी मिळतो. परंतु, त्या ग्रंथालयाचे निकष पाळण्याची गरज आहे. त्यातच जिल्हा ग्रंथालय अ श्रेणीचे येत असून, येथूनच ग्रंथालयावर नियंत्रण ठेवले जाते. त्याचे अनुदान, कामकाज यासंदर्भात सर्व कामे जिल्हा ग्रंथालयातूनच चालवले जातात. परंतु, येथे कर्मचाऱ्यांची कमतरता आहे.

### ग्रंथालयाचे गाव उपेक्षित

**राज्य शासनाने जिल्ह्यातील एका गावात सर्व सुविधायुक्त ग्रंथालय उघडण्याची घोषणा केली होती. त्यात गोंदिया जिल्ह्यातील नवेगावबांध येथे ग्रंथालय उघडण्यात येणार होते. त्यामुळे वाचनप्रेमींनी आनंद व्यक्त केला होता. मात्र घोषणेला दोन वर्षांचा काळ लोटला असला तरीही कोणतीही हालचाल सुरू झाली नाही. त्यामुळे हा निर्णय देखील केवळ घोषणेपुरताच तर नव्हता, असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.**

## वाहतुकीत कोंडी जैसे थे?

**गोंदिया :** शहरातील अरुंद रस्त्यांमुळे मुख्य बाजार परिसरात वारंवार वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. वाहतुकीत अडकलेल्या वाहनचालकांकडून एकमेकांना मागे टाकत पुढे जाण्याच्या घाईत सतत हार्न वाजवले जात असल्यामुळे शहरातील ध्वनी प्रदूषणही झपाट्याने वाढत आहे. तसेच गोंदिया शहरातील गोरेलाल चौक हा दररोज वाहतूक कोंडीच्या समस्येला सामोर जात आहे.

या चौकात वाहतूक नियंत्रणासाठी पोलिस कर्मचारी नेमलेले असले तरीही रस्ता अरुंद असल्याने वाहतूक सुरळीत करणे कठीण जात आहे. परिणामी नागरिकांना रोजच मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त. शहरातील मुख्य रस्त्यांवर शासकीय रुग्णालये आणि शाळा देखील आहेत. यासोबतच दुकाने आणि त्यांच्या समोर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनांमुळे थोड्याथोडक्या वेळेत जामची स्थिती निर्माण होते.

## श्रीगुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिराचे उद्घाटन


**नवेगावबांध :** अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळ, गुरुकुंज आश्रम मोझरी अंतर्गत कार्यरत राष्ट्रधर्म प्रचार संस्था यांच्या वतीने आयोजित श्रीगुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिर २०२५ चा शुभारंभ आज उत्साहात व भक्तिभावाने संपन्न झाला. शिबिर २५ एप्रिल ते २ मे २०२५ या कालावधीत आरुषी पब्लिक स्कूल, नवेगावबांध येथे भरविण्यात आले आहे.

शिबिराचा प्रारंभ दीपप्रज्वलन करून करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कुलदीप लांजेवार यांनी उपस्थित राहून शिबिरार्थींना प्रेरणादायी विचार दिले. प्रमुख पाहुणे म्हणून नवेगावबांधचे ठाणेदार चाफले, डॉ.अ.का.कापगते, पंचायत समितीच्या सभापती आम्रपाली डोंगरवार, तसेच वैशाली बोरकर आणि मनिषा तरोणे आदि उपस्थित होते.

मान्यवरांच्या मुखातून श्रीगुरुदेवांच्या विचारांचे अमृतमय बोध लाभले. 'राष्ट्राचे खरे उभारण हे सुसंस्कारित, चारित्र्यसंपन्न आणि राष्ट्रभक्त नागरिक घडविण्यात आहे,' हे संदेश अधोरेखित करत त्यांनी शिबिरार्थींना अध्यात्म, देशभक्ती, समाजसेवा व आत्मविकास यांची ओळख करून दिली. श्रीगुरुदेवांच्या जीवनकार्याची उदाहरणे देत, आजच्या पिढीला वडीलधाऱ्या पिढीने दिलेले संस्कार, त्यागाची शिकवण, आणि निस्वार्थी सेवा याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. प्रत्येक मान्यवराने आपल्या भाषणातून शिबिरार्थी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, सदाचार व सकारात्मक जीवनदृष्टी जोपासण्याचे आवाहन केले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थ्यांचे यश

### सात विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र



**गोंदिया :** पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा ( इयत्ता आठवी) चा निकाल जाहीर झाला आहे. या निकालात अनु.जाती व नवबौध्द मुलांची शासकिय निवासी शाळा, मुर्री येथील सात विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. यामुळे सातही विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीकरीता निवड झाली आहे.

पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये मुर्री येथील अनु.जाती व नवबौध्द मुलांची शासकिय निवासी शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या परीक्षेत विक्रांत रवींद्र टेंभूर्णे, यथार्थ नारेन्द्रकुमार मेश्राम, सौरभ देवानंद साऊस्कार, डेव्हिड गंगाधर जांभूळकर, अंश महेश राऊत, अनिकेत ओमकार कोकोडे, सुशांत रोशन वालदे या सात विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहे. सर्व पात्र, यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचे समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त विनोद मोहतुरे, मुख्याध्यापक रविशंकर ईठुले, वर्गशिक्षिका, इंग्रजी, गणित, बुद्धिमत्ता चाचणी व मराठी विषय शिकवणारे अनुक्रमे वर्ग शिक्षक अस्मिता तेलंग, नीता भलमे, साधना पारधी, प्रदीप ढवळे, सहा.शिक्षक शिक्षिका अर्चना चौव्हान, स्वाती राणा, कार्तिक शहारे, प्रगति खोब्रागडे, मुन्नाभाई नंदागवली, तुषार महाजन व शिक्षकेतर कर्मचारीगण आदिंनी अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय शाळा प्रशासन व पालकांना दिले आहे.

## नमाद महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



गोंदिया : गोंदिया शिक्षण संस्था द्वारा संचालित येथील नटवरलाल माणिकलाल दलाल महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच स्पर्धा परिक्षांमध्ये सुयश प्राप्त करून शासकीय सेवेत रुजू होणाऱ्या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

नमाद महाविद्यालयात चालू शैक्षणिक सत्रात शिक्षण घेत असलेली विद्यार्थी सरिता खोटेलेची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महसूल सहायक पदी निवड झाली. उज्वला शहारे आयुध निर्माण कारखाना चंद्रपूर येथे तंत्रज्ञ म्हणून निवड झाली तर रूपेश बावणे याची महाराष्ट्र वनविभागात वनरक्षक म्हणून निवड झाली. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना शासकीय सेवेत रुजू होणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्राचार्य डॉ.रविद्र मोहतुरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रा.रवी रहांगडाले, डॉ.संजय जगणे, डॉ.योगराज बैस, डॉ.अंबादास बाकरे उपस्थित होते. या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनाही सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देउन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थी गितांश असाटी व खुदशिया शेख यांनी तर आभार यश जैन यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ.सरीता उदापूरकर, डॉ.तुप्ती पटेल, डॉ.खुशबु होतचंदानी, डॉ.अश्विनी दलाल, डॉ.भावेश जसानी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## देवरी येथे डॉ.बाबासाहेबांना अभिवादन




**देवरी :** येथील मुलगंध कुटी बौध्द विहार विविध उद्देशिय संस्था देवरी (र.नं.) च्या वतीने डॉ. बाबासाहेब आबेडकर यांची १३४ जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सर्व प्रथम भगवान बुध्द व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती स्मारकावर मेनबत्ती व अगरबत्ती प्रज्वलीत करून मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पीत करून समता सैनिक दल शाखा देवरीच्या वतीने मान वंदना देण्यात आली.त्यानंतर या विहारात सामुदायीक बुध्द वंदना झाली. बुध्दवंदनेनंतर श्रध्देय भदन्त महास्थवीर गुणरत्न दायक,ग्रंथमित्र एडँ. डॉ. श्रावण उके परिवार यांच्या प्रमुख उपस्थित चेत्य स्तुपाचे अनावरण देवरीचे चे नगराध्यक्ष संजू उईके यांच्या अध्यक्षतेखाली व पुज्य भिक्खू परमदा यांच्या शुभ हस्ते देवरी येथील विहारातील चैत्य स्तुपाचे अनावरण करण्यात आले. नंतर दुपारी ३ वाजता भव्य रैलीचे आयोजन करण्यात आले. ही देवरी नगरातून भ्रमण करीत या रैलीचे समापन देवरीच्या विहारात करण्यात आले. या नंतर सांयकांळी ७ वाजता देवरी नगराध्यक्ष संजू उईके यांच्या अध्यक्षतेखाली आणि या क्षेत्राचे आमदार संजय पुराम यांच्या प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे व अतिथी देवरीचे नगरसेवक आणि नगरसेवीका यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.नंतर संस्थेच्या अध्यह सिताबाई रंगारी यांनी आमदार संजय पुराम यांना संस्थेच्या विविध मागण्या संदर्भात निवेदन सादर केले. या निवेदनातून विशेष करूण विहाराच्या वरिल भागात गोल घुमट, (गोलाकार स्तूपाची )मागणी करण्यात आली.या प्रसंगी आमदार पुराम व नगराध्यक्ष उईके यांनी अमुल्य मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्तावीक वाचन व संचालन ग्रंथमित्र एडँ श्रावण उके यांनी तर उपस्थितांचे आभार संस्थेचे सचिव भाऊराव रंगारी यांनी मागले. कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता इशांत मस्के, भाऊराव रंगारी,राजू बन्सोड,सुरेश घरडे यांच्यासह संस्थेचे इतर पदाधिकारी, सदस्य व सर्व बौध्द समाज बांधवांनी सहकार्य केले.

## भाजप तालुकाध्यक्षपदी संजू उईके



**देवरी :** देवरी तालुका भाजपच्या अध्यक्षपदी संजू ऊईके यांची निवड करण्यात आली. पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने त्यांच्यावर दाखवलेला विश्वास आणि कार्यक्षमतेची दखल घेत ही निवड करण्यात आली आहे. संजू ऊईके हे नगरपंचायतचे नगराध्यक्ष सुध्दा आहेत.

संजू उईके हे गेल्या काही काळात सामाजिक व विकासात्मक कार्यात सातत्याने पुढाकार घेत असल्याने पक्षाच्या वतीने त्यांना तालुका अध्यक्ष पदाची धुरा सोपविण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या नियुक्तीबद्दल संजू उईके यांनी भाजपच्या राज्य व जिल्हा नेतृत्वाचे आभार मानले असून, मिळालेली जबाबदारी पूर्ण निष्ठेने पार पाडण्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

या निवड प्रकियेत आ.संजय पुराम, विजय शिवनकर, माजी तालुका अध्यक्ष प्रवीण दहिकर, प्रमोद संगिड़वार, अनिल बिसेन, अनिल येरने, यादोभाऊ पंचमवार, प्रशांत संगिड़वार, रितेश अग्रवाल, बबलू डोये, नितेश वालोदे, विनोद भांडारकर, प्रज्ञा संगिड़वार, कौशल्या कुंभरे, पिंकी कटकवार आदिंनी भुमिका बजावली.

# शहरवासीयांनी पिण्याच्या पाण्याची चिंता करू नये : आ.अग्रवाल

### पुढील ५०० दिवसांसाठी पाणी राखीव



**गोंदिया :** शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या वैनगंगा नदीपात्रात पाण्याचे स्त्रोत कमी झाल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या वतीने एक दिवस आड पाणी पुरवठा केला जात आहे. यामुळे शहरात पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे. परंतु, ही समस्या काही दिवसांकरीताच असून पिण्याच्या पाण्यासाठी शहरवासीयांनी चिंता करून नये, आगामी ५०० दिवसांसाठी पाणीसाठा राखीव ठेवण्यात आला आहे, असे आश्वासन आ.विनोद अग्रवाल यांनी दिले.

पाणीटंचाईच्या समस्येला घेवून आ.विनोद अग्रवाल यांनी पाणी नियोजनात्मक विशेष बैठक बोलाविली होती. आणि प्रकल्प क्षेत्राची पाहणी करून प्रत्यक्ष स्थितीचा आढावा घेतला. याप्रसंगी नगर परिषद, तहसीलदार, मजिप्राचे कार्यकारी अभियंता, बाग इटियाडोह प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता आदिंशी चर्चा करून विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

भविष्यात तीव्र उन्हाळा आणि संभाव्य पाणीटंचाई आणि पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे गोंदियातील रहिवाशांना पुढील ५०० दिवसांसाठी पुरेसे पाणी मिळावे, यासाठी एक हजार कोटी लिटर पाणी राखीव ठेवण्यात आले आहे. ज्यामध्ये पाणी नियोजनाचा सविस्तर आराखडा तयार करण्यात आला. बैठकीनंतर आमदारांनी स्वतः सर्व अधिकाऱ्यांसह पंप हाऊस आणि नदीच्या जागेला भेट दिली. तातडीच्या परिस्थितीत, आमदारांनी आज बाग इटियाडोह प्रकल्पाला पिण्यासाठी पाणी सोडण्याचे आदेश दिले आहेत. हे पाणी पुढील ७ दिवसांत गोंदियात पोहोचेल आणि नियमित आणि मुबलक पाणीपुरवठा पुन्हा सुरू होईल, दरम्यान, शहरवासीयांनी संयम बाळगावा आणि कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन करण्यात आले आहे.

याप्रसंगी आ.विनोद अग्रवाल यांच्यासोबत न.प.चे प्रभारी मुख्य अधिकारी व प्रशासक आणि अतिरिक्त तहसीलदार श्रीकांत कांबळे, मजिप्राचे कार्यकारी अभियंता गणवीर, बाग इटियाडोह प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता कुरेकर, उप अभियंता डोंगरे, मध्यम प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता पाटील, उप अभियंता मडकाम, अभियंता मजीप्रा पालथे उपस्थित होते.

RNI No.- MAHAMAR-2010/35801 महासागर भंडारा
**मालक, मुद्रक, प्रकाशक** -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक**- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन - ०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)



# अडचण येणार नाही

मॅच मेकिंग

माझा प्रियकर भारतीय लष्करात अधिकारी आहे. गेल्या आठ वर्षांपासून आम्ही लाँग डिस्टंस रिलेशनशीपमध्ये आहोत. पण आता माझ्याच शहरात त्याचं पोस्टिंग होणार आहे. अर्थात यामुळे आम्हाला काही काळ एकत्र घालवता येणार असला तरी सततच्या सहवासामुळे त्याला वाटणारं प्रेम कमी होईल की काय, अशी मला भीती वाटते. त्याला मी आवडेनाशी झाले तर, या विचाराने मी खूप अस्वस्थ झाले आहे. मला मदत करा.

**उत्तर :** गेली आठ वर्षं तुम्ही हे नातं जपलं आहे. तुमच्यात अनोखे बंध तयार झाले आहेत. लाँग डिस्टंस रिलेशनशीपमध्ये एवढा काळ घालवल्यानंतर एकत्र आल्याने काय होईल, अशी भीती अगदी रास्त आहे. तुम्ही एकाच शहरात राहून एकमेकांची स्पेस जपली तर कोणतीही अडचण येणार नाही. नात्यापलीकडचं आयुष्य जपण्यासाठी तुम्ही दोघांनीही एकमेकांना स्पेस आणि वेळ देणं गरजेचं आहे. संवादाचे सर्व मार्ग खुले ठेवा. एकमेकांशी म ोकळेपणाने बोला. मनात काहीही ठेऊ नका. एकमेकांवर हक्क गाजवणं, गरजेपेक्षा जास्त काळजी करणं टाळा. यामुळे एकत्र असतानाही तुम्ही नात्यातलं वेगळेपण टिकवून ठेऊ शकाल. तुमचं नातं एकसुरी होणार नाही आणि प्रत्यक्ष सहवासामुळे नात्याचे बंध अधिक घट्ट होतील. त्यामुळे कोणतीही धास्ती न बाळगता या नव्या बदलाला सामोरी जा.

# कारकुनी करणारा न्यायाधीश झाला

अचिव्हर

जिद्द, चिकाटी आणि कष्ट करण्याची तयारी असेल तर माणूस असाध्य वाटणारेही साध्य करू शकतो. अशी अनेक उदाहरणे आपल्याला पदोपदी पाहायला मिळतात. वकिलाच्या कार्यालयात कारकुनी करणाऱ्याने अशा कठोर परिश्रम आणि अभ्यासाच्या बळावर न्यायाधीशपदापर्यंत झेप घेतली आहे. अमित साठे असे या तरुणाचे नाव आहे.

भोर येथील या २८ वर्षीय युवकाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या न्यायाधीश आणि प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. त्याने राज्यातील निवड झालेल्या ११४ न्यायाधीशांच्या यादीत ३६ वा क्रमांक मिळवला आहे. त्यामुळे आता अमित दिवाणी न्यायाधीश आणि न्यायदंडाधिकारी म्हणून न्यायदान करणार आहे.

**प्रेरणादायी प्रवास**

अमितचा हा प्रवास अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. अमित भोरमधील एका सामान्य कुटुंबात जन्मला. घराची परिस्थिती बेताची होती. त्याचे शालेय शिक्षण छत्रपती शिवाजी विद्यालयात झाले तर उच्च शिक्षण अनंतराव थोपटे महाविद्यालयात झाले. वडील टपाल खात्यात कार्यरत आहेत. आईच्या प्रेरणेने अमितला शिक्षणाची आवड निर्माण झाली. वाणिज्य शाखेत पदवी घेतल्यानंतर त्याला एलएलबी करायची इच्छा होती. पण घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे त्याला एक वर्षाचा ब्रेक घ्यावा लागला.



**कसा केला अभ्यास?**

या काळात अमितने बँकेत शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या अर्जांचे काम केले. त्यानंतर त्याला भोरमधील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. विजय मुकादम यांच्या कार्यालयात कारकुनाची नोकरी मिळाली. या ठिकाणी काम करताना ॲड. मुकादम यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने एलएलबीला प्रवेश घेतला आणि अभ्यासाला सुरुवात केली. २०२१ मध्ये पुण्यातील यशवंतराव चव्हाण विधी महाविद्यालयातून त्याने एलएलबीची पदवी मिळवली. त्यानंतर लगेचच दिवाणी न्यायाधीश व न्यायदंडाधिकारी परीक्षेची तयारी सुरू केली. काही कारणांमुळे परीक्षा लांबणीवर पडली तरी अमितने अभ्यास अखंड सुरू ठेवला. तो नियमितपणे अनंतराव थोपटे महाविद्यालयाच्या ग्रंथालयात जाऊन अभ्यास करत असे.

**दोन वर्षांच्या परिश्रमाचे फळ**

अशाप्रकारे सलग दोन वर्षे त्याने अथक परिश्रम घेतले. ॲड. विजय मुकादम व ॲड. अजिंक्य मुकादम यांच्या मार्गदर्शनाखाली अमितने या परीक्षेची जोरदार तयारी केली. यासोबतच पुण्यातील एका खासगी अकादमीत आठवड्यातून एकदा होणाऱ्या व्याख्यानाचाही त्याला लाभ झाला. या सर्व प्रयत्नांमुळेच अमितने पहिल्याच प्रयत्नात हे यश संपादन केले आहे. अमितचा हा संघर्षमय प्रवास निश्चितच अनेक तरुणांना नवी दिशा आणि प्रेरणा देणारा आहे.

# युवा मानस

## फंडू एसएमएस

| | | |
|---|---|---|
| हम सब एक दूसरे के बिना कुछ नहीं है, यही रिश्तों की खूबसूरती है। | हराना है तो मैदान में आके हराना, वरना दिल जीतने की आदत तो बचपन से है। | हुकुमत की है हमने कोई लूट नहीं, वो निलाम भी हुए, तो आखरी बोली हमारी रहेगी। |

टेक अपडेट्स

## चॅटबॉटची नवीन क्षमता




चॅटबॉट नवीन व्हॉइस आणि इमेज क्षमता सादर करणार आहे. त्यामुळे वापरकर्त्यांना आपला आवाज वापरून प्रश्न विचारता येतील आणि हे उपकरण मानवासारखा प्रतिसाद मिळेल. याचा अर्थ असा, की तुम्ही व्हॉइस असिस्टंटशी बोलता तसे आता चॅटबॉटशीही बोलू शकाल. चॅटबॉट तोंडी उत्तर देईल. त्याला क्रॉस प्रश्नदेखील विचारता येऊ शकतील. ङ्गओपन एआयफनुसार, चॅटजीपीटी वापरकर्ते आता मोबाइल फोनवरून चॅटबॉट्सशी संवाद साधू शकतात आणि रिअल-टाइममध्ये प्रतिसाददेखील प्राप्त करू शकतात. नवीन अपडेट मिळवण्यासाठी प्रथम मोबाइलवर चॅटजीपीटी उघडा. त्यानंतर सेटिंग्ज मध्ये जा. येथे तुम्हाला नवीन वैशिष्ट्ये पर्यायाखाली व्हॉइस चॅट सक्षम करण्याचा पर्याय मिळेल. ते चालू केल्यानंतर तुम्ही चॅटबॉटशी बोलू शकता.

# फिरायला जाताय?

भटकंती

रोजच्या धावपळीपासून थोडी विश्रांती घेऊ इच्छित असाल तर शांतता, ऐतिहासिक स्थळांची सफर आणि आत्मिक शांतता मिळवण्यासाठी काही ठिकाणांची अवश्य निवड करा. लखनऊहून तीन दिवसांच्या छोट्या आणि संस्मरणीय ट्रिपसाठी खालील सुंदर ठिकाणे उत्तम पर्याय ठरू शकतात.



*** चित्रकूट**

चित्रकूट हे लखनऊपासून सुमारे २३० किलोमीटर अंतरावर आहे. हे ठिकाण धार्मिक आणि नैसर्गिक सौंदर्याने नटलेले आहे. मानले जाते की, भगवान रामाने वनवासातील अनेक वर्षे येथे घालवली. मंदाकिनी नदीच्या काठावर वसलेले हे स्थान अत्यंत शांत आणि पवित्र आहे. येथे सकाळ-संध्याकाळ घाटांवर भव्य आरती होते. परिसरातील हिरवळ आणि जंगलं पर्यटकांना आकर्षित करते. राम घाट हे प्रमुख श्रद्धास्थान मानले जाते. कामदगिरी पर्वताची परिक्रमा करण्याची धार्मिक परंपरा आहे. गुप्त गोदावरी, हनुमान धारा ही महत्त्वाची तीर्थस्थळे आहेत.

*** चंपावत**

चंपावत हे उत्तराखंड राज्यातील एक सुंदर आणि शांत शहर आहे. हे



शहर लखनऊपासून सुमारे ४२० किलोमीटर अंतरावर आहे. तीन दिवसांच्या सहलीसाठी चंपावत हा एक उत्तम पर्याय ठरू शकते. हिमालयाच्या पायथ्याशी वसलेले हे ठिकाण निसर्गसौंदर्याने नटलेले आहे. येथे प्राचीन मंदिरे आणि घनदाट जंगलांचे सौंदर्य अनुभवता येते. बालेश्वर मंदिर हे चंपावतमधील एक प्रमुख आकर्षण आहे. नानकमत्ता गुरुद्वारा आणि देवी हिंगला मंदिर हीदेखील महत्त्वाची ठिकाणे आहेत. गर्दीपासून दूर, शांतता शोधणाऱ्यांसाठी चंपावत हे एक आदर्श ठिकाण आहे.

*** मिनार**

धौहरा हे लखनऊपासून सुमारे १९० किलोमीटर अंतरावर आहे. हे ठिकाण कटरनियाघाट वन्यजीव अभयारण्यासाठी प्रसिद्ध आहे. जंगल सफारीसाठी हे ठिकाण एक उत्तम पर्याय आहे. येथे शांत आणि निसर्गरम्य वातावरण अनुभवता येते.

*** श्रावस्ती**



श्रावस्ती हे बौद्ध धर्माशी संबंधित एक ऐतिहासिक ठिकाण आहे. ते लखनऊपासून सुमारे १७० किलोमीटर अंतरावर आहे. भगवान बुद्धांनी येथे अनेक वर्षे वास्तव्य करून ध्यान आणि उपदेश दिले होते. शांतता आणि आध्यात्मिक अनुभव मिळवण्यासाठी येथे अनेक पर्यटक येतात.

टेक टॉक

## स्मार्टफोनची सुरक्षितता कशी कराल?

आजच्या डिजिटल युगात स्मार्टफोन सुरक्षिता लॉक करणे आवश्यकच आहे. यासाठी फिंगरप्रिंट, फेस लॉक, पॅटर्न लॉक आणि पिन कोड हे पर्याय आहेत. फिंगरप्रिंट लॉक झपाट्याने फोन अनलॉक करते. पण याचे काही तोटेही आहेत. झोपेत असताना कोणी तुमचे बोट फोनवर ठेवले तर लॉक उघडू शकते. तसेच ओलसर किंवा मळलेले बोट असले, तर फोन अनलॉक करण्यात अडचण येते. फेस अनलॉक वापरणे अत्यंत सोयीचे वाटते पण बहुतांश स्मार्टफोनमध्ये २ डी फेस रेकग्निशन असते. ते कॅमेऱ्याच्या सहाय्याने चेहरा स्कॅन करते आणि कधीकधी फोटोवरूनसुद्धा फोन उघडू शकतो. आयफोनसारख्या प्रीमियम फोनमध्ये थ्री डी फेस आयडी अधिक सुरक्षित असतो. पण तोही कमी प्रकाशात अचूक काम करत नाही. पॅटर्न लॉक लोकप्रिय आहे कारण ते वापरणे सोपे आहे; मात्र स्क्रीनवर उरलेले बोटांचे ठसे आणि सहज ओळखता येणाऱ्या डिझाइन्समुळे ते फारसे सुरक्षित मानले जात नाही. पिन कोड हा आजही सर्वात विश्वासार्ह पर्याय मानला जातो. विशेषतः तुम्ही आठ अंकी पिन किंवा अल्फान्यूमेरिक पासवर्ड वापरत असाल तर डेटा हॅक करणे जवळजवळ अशक्य होते. पिन कोड कोणाच्या चेहऱ्यावरून, बोटावरून किंवा पॅटर्नवरून ओळखता येत नाही. म्हणून तो सर्वाधिक सुरक्षित आहे.



# परदेशातून वैद्यकीय शिक्षण?

करिअर ग्रोथ

बारावीनंतर अनेकांना मेडिकल सायन्स म्हणजे वैद्यकीय शाखेकडे वळायचं असतं. भारतात नीट परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांना वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळतो. पण नीट परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लाखोंमध्ये असताना जागा मात्र काही हजार असतात. यामुळे बरेच विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहतात. अशा परिस्थितीत परदेशातून वैद्यकीय शिक्षण घेण्याचा एक पर्याय तुमच्याकडे आहे. या पर्यायाची निवड करताना नेमक्या कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यावं याविषयी...



* परदेशातलं शिक्षण तुमच्या करीअरला वेगळं वळण देऊ शकतं. तिथले अनुभव तुम्हाला समृद्ध करत असतात. विकसित देशांमधून वैद्यकीय अभ्यासक्रम शिकून आलेल्या विद्यार्थ्यांना विविध विकारांचं चांगलं ज्ञान मिळू शकतं. अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी अवगत होता येतं.

* भारतीय विद्यार्थ्यांना काही देशांमध्ये वैद्यकीय प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा द्यावी लागत नाही तर काही ठिकाणी याची तरतूद आहे. अमेरिका, न्यूझीलंड, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, कॅनडा, मलेशियासारख्या देशांमध्ये प्रवेश परीक्षा द्यावी लागते. चीन, जर्मनी, फिलिपाईन्स, नेपाळ, युक्रेन, बांग्लादेश, रशिया, किर्गिझस्तानसारखे देश विद्यार्थांना थेट प्रवेश देतात.

* परदेशात एमबीबीएस करण्याचा विचार असेल तर सर्वात आधी इंटरनेटवरून विविध देशांमधल्या अभ्यासक्रमांची माहिती करून घ्या. तिथली प्रवेशप्रक्रिया समजून घ्या. समुपदेशकाची मदतही घेता येईल.

* परदेशातल्या बऱ्याच संस्था मान्यताप्राप्त नसतात. यामुळे तुमची फसवणूक होऊ शकते. म्हणूनच संस्थेची मान्यता तपासून बघा.

# स्कीन टोननुसार शेरवानी निवडा

स्मार्ट शॉपिंग



प्रत्येकाला आपल्या लग्नात वेगळे आणि सुंदर दिसायचे असते. केवळ वधूलाच नाही तर वरालाही लग्नात स्टायलिश दिसावे असे वाटते. अशा परिस्थितीत शेरवानी निवडताना स्कीन टोननुसार रंग निवडला तर अधिक तेजस्वी दिसालच खेरीज लग्नात तुम्ही एकमेकांना पूरक दिसाल. आत्मविश्वास आणि स्टाईलने हा वेश परिधान केल्यास उपस्थितांवर तुमची छाप पडल्याखेरीज राहणार नाही.

**गोऱ्या त्वचेसाठी निवड**

तुमचा स्कीन टोन गोरा असेल तर ब्राइट हिरवा, नेव्ही ब्लू, वाईन, चमकदार जांभळा असे रंग योग्य असतील. त्याच वेळी, वधूच्या त्वचेचा टोनही गोरा असेल तर रुबी, लाल, टोमॅटो लाल, मरून, गडद गुलाबी, सोनेरी, निळा आणि लव्हेंडर असे रंग तिच्या पोशाखासाठी खूप सुंदर दिसतील.

**डस्की स्किन टोनसाठी...**

तुमचा त्वचेचा टोन डस्की असेल तर उबदार आणि किंचित मातकट रंग निवडा. केशरीऐवजी तुम्ही केशरी, पिवळा, लाल, किरमिजी गुलाबी, पीच असे रंग निवडू शकता. रॉयल ब्लू आणि डस्की पिंक कलर मीडियम टोनवर चांगला दिसतो.

**गडद टोनसाठी...**

स्किन टोन गडद असेल आणि शेरवानीमध्ये क्लासी आणि एलिगंट लुक हवा असेल तर तुम्ही चमकदार रंग टाळावेत. जसे की तुम्ही राखाडी, काळा असे रंग परिधान करू शकता. त्याच वेळी वधूने गडद लाल, किरमिजी रंग, नेव्ही ब्लू आणि गडद जांभळा यासारखे थंड आणि अंडरटोन रंग निवडावे. यामुळे त्वचेचा रंग निस्तेज नाही तर चमकणारा दिसतो.

**फॅब्रिकची निवड**

रेशीम आणि मखमलीसारखे फॅब्रिक सर्व त्वचेच्या टोनवर चांगले दिसते. त्यावर स्किन टोननुसार गोल्डन आणि सिल्व्हर ॲक्सेसरीज निवडा. गोऱ्या टोनवर रुपेरी रंग चांगला दिसेल तर डस्की टोनवर सोनेरी किंवा गुलाबी रंग अधिक शोभेल.

# अशा 'टोप्या' घाला

फॅशन पॅशन



मित्रांनो, उन्हाळ्यात डोक्यावर टोपी हवीच. या दिवसात मुलांच्या ॲक्सेसरीमध्ये टोपीला खूप महत्त्व असतं. पण टोपी आता साधीसुधी राहिलेली नाही. विविध प्रकारच्या, आकाराच्या फॅन्सी टोप्या ट्रेंडमध्ये आहेत. टोप्यांचे हे वैविध्यपूर्ण प्रकार तुम्हाला गोंधळात टाकू शकतात. मात्र पेहरावानुसार टोपीची निवड करायची आहे हे लक्षात ठेवा. पेहरावाला शोभणारी टोपी असेल तर नो टेन्शन.

बाजारात नजर टाकली तर बेसबॉल कॅप्स, फाईव्ह पॅनल कॅप्स, ड्रायव्हर सीट कॅप्स, ट्रकर्स कॅप अशा कॅप्सच्या भरपूर व्हरायटी पहायला मिळतील. बेसबॉल कॅप्स गेल्या अनेक वर्षांपासून वापरात आहेत. बेसबॉल या खेळामुळे १९०० व्या शतकापासूनच या प्रकारच्या कॅप्सना लोकप्रियता मिळाली. त्यामुळे ही कॅप मुलांच्या वॉर्डरोबचा अविभाज्य भाग झाली. या स्टाईलला थोडं ट्विस्ट देऊन डॅड कॅप्स बाजारात आल्या. बेसबॉल कॅपच्या तुलनेत डॅड कॅपच्या पुढच्या भागाची लांबी थोडी कमी असते. एवढाच काय तो या दोहोंमधला फरक.

फाईव्ह पॅनल ही स्केटर्सची आवडती कॅप आहे. पण ती घालण्यासाठी तुम्ही स्केटर असणं गरजेचं नाही. प्लेन टी शर्ट आणि ट्राउझरवर ती शोभून दिसते. बऱ्याच सेलेब्जना ड्रायव्हर स्टाईल कॅप आवडते. ॲथलेटिक लूकसाठी तुम्ही ट्रकर्स कॅप घालू शकता. मग कॅप्समधली एवढी व्हरायटी बघून तुम्ही थक्क झालात ना? आता शॉपिंगला गेल्यावर एखादी ट्रेंडी कॅप नक्की विकत घ्या.

टेक अपडेट्स




## क्यूआर कोड स्कॅनने होणार सर्व कामे

सध्या तुम्हाला प्रत्येक महत्त्वाच्या कामासाठी आधार कार्ड सोबत न्यावे लागते; परंतु आता आधार ॲपमध्ये फक्त क्यूआर कोड स्कॅन करून तुम्ही स्वतःची ओळख पटवू शकता. आधार ॲप डाउनलोड करून क्यूआर कोड स्कॅनफ करायचा आहे. क्यूआर कोड स्कॅन केल्यावर तुमची सर्व माहिती स्क्रिनवर दिसणार आहे. यामध्ये तुमचे डिजिटल आधारकार्डदेखील दिसणार आहे. या नवीन ॲपमुळे तुम्हाला आधार कार्ड सोबत ठेवण्याची गरज नाही. त्याचा फोटोदेखील ठेवणे गरजेचे नाही.आता व्हेरिफिकेशन खूप सोपे होणार आहे. आधार ॲपमध्ये जाऊन फेस आयडी ऑथेंटिकेशन करून तुम्ही तुमची ओळख पटवू शकतात. यूपीआय ॲप काम करते त्याचप्रकारे तुम्हाला आधार ॲपमध्ये जाऊन क्यूआर कोड स्कॅन करायचा आहे. याचपद्धतीने तुमची माहिती दुसऱ्या व्यक्तीला देऊ शकता. खेरीज आवश्यक तेवढी माहितीच शेअर करू शकता.

# ...पण धावत राहा

फिटनेश फंडा



धावणं हा अगदी साधा, सोपा व्यायाम आहे. प्रत्येक जण आपल्या वेळेनुसार धावतो. कोणी सकाळी लवकर धावायला जातात तर कोणी संध्याकाळ किंवा रात्रीची वेळ निवडतात. अशावेळी धावायची योग्य वेळ कोणती, हा प्रश्न आपल्याला पडतो. प्रत्येक व्यक्ती आपल्या सोयीनुसार पळायला जात असली तरी एका संशोधनानुसार शरीराचं तापमान सर्वोच्च पातळीवर असताना व्यायामाचे सर्वाधिक लाभ होतात. दुपारी चार ते पाच या वेळात शरीराचं तापमान सर्वोच्च पातळीवर पोहोचलेलं असतं. सायंकाळी सात वाजताही शरीराच्या तापमानाने सर्वोच्च पातळी गाठलेली असते. याच कालावधीत लोकांना जास्त ताजंतवानं वाटतं. याच काळात फुफ्फुस आणि स्नायू पूर्ण कार्यक्षमतेने काम करत असतात. अर्थात दुपार आणि संध्याकाळची वेळ धावण्यासाठी योग्य असल्याचे कितीही दावे होत असले तरी तुमच्या दिनक्रमात बसणारी वेळ व्यायामासाठी सर्वोत्तम असते, असं तज्ज्ञ सांगतात.

सकाळच्या वेळेत शरीराचं तामपान नीचांकी पातळीवर असतं. पण सकाळी धावल्यामुळे एकाग्रता वाढायला मदत होते, असं म्हटलं जातं. तसंच यामुळे तुम्ही उत्साही रहाता. मात्र शरीराचं तापमान कमी असल्यामुळे ऊर्जेची पातळीही घसरलेली असते. त्यामुळे सकाळची वेळ व्यायामासाठी योग्य नसल्याचं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. तसंच या काळात हृदयविकाराचा झटका किंवा स्ट्रोक येण्याची शक्यताही जास्त असल्याने व्यायाम टाळण्याचा सल्ला दिला जातो. सकाळी धावल्याचे खूप चांगले परिणाम दिसत नसले तरी दिवसभर कामावर लक्ष केंद्रित करणं यामुळे शक्य होतं.

दुपारच्या वेळी शरीरात पुरेशी ऊर्जा साठलेली असते. म्हणूनच या वेळी धावल्यामुळे चांगले परिणाम दिसत असल्याचं संशोधन सांगतं. अर्थात दुपारच्या वेळी कोणीही धावू शकत नाही. त्यामुळे धावणं टाळण्याऐवजी तुमच्या सोयीची वेळ निवडा आणि भरपूर व्यायाम करा असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे.

# अनेक शिक्षकांच्या अटकेची शक्यता

## सायबर पोलिसांकडून नोटीस : माजी उपसंचालक जामदार यांची टाळाटाळ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
जिल्ह्यात २०१९ पासून शेकडो प्राथमिक शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना गैरमार्गाने शालार्थ आयडी प्रदान करण्यात आले. याप्रकरणी आतापर्यंत अधिकाऱ्यांनाच अटक झाली. परंतु, आता शेकडो शिक्षकही रडारवर आले असून सायबर पोलिसांनी त्यांना नोटीस बजावली आहे. काहींची चौकशीही सुरू झाल्याची माहिती आहे.

२०१४ च्या शिक्षक भरतीला मान्यता देणाऱ्या शासन निर्णयाचा गैरफायदा घेत गणित, इंग्रजी आणि विज्ञान विषयाच्या शिक्षकांची गैरमार्गाने भरती करण्यात आली. या प्रकरणात सहभागी सर्व संबंधितांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश शिक्षण विभागाकडून देण्यात आले आहेत. राज्यात २०११ मध्ये अनुदानित शाळांची पडताळणी करण्यात आली.

त्यावेळी नोंदी असलेले विद्यार्थी आणि प्रत्यक्ष हजर विद्यार्थ्यांच्या संख्येत मोठी तफावत आढळून आली. खोटी विद्यार्थी संख्या दाखवून शिक्षकांची पदे भरली जात असल्याचा निष्कर्ष पडताळणी समितीने काढला.

त्यामुळे राज्य शासनाने २ मे २०१२च्या शासन निर्णयानुसार, राज्यात शिक्षक भरतीवर बंदी घालत अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन झाल्याशिवाय नवीन भरती होणार नाही, असे स्पष्ट आदेश दिले. असे असतानाही २०१४ मध्ये नवीन शासन आदेश काढण्यात आला.

राज्यात २०१९ पासून अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये रूजू होणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्याला शालार्थ आयडी देण्याचा अधिकार विभागीय शिक्षण उपसंचालकांना देण्यात आला. याचा गैरफायदा घेत बनावट कागदपत्रे, शिक्षण संस्थांचा बनावट शिक्षक मान्यतेचा प्रस्ताव आणि शिक्षणाधिकाऱ्यांची खोटी स्वाक्षरी करून २०१९ पासून शेकडो शिक्षकांची भरती केली.

परंतु, २०१४ पासून गणित, विज्ञान आणि इंग्रजी विषयाच्या शिक्षक भरतीला मान्यता मिळाल्याने तेव्हापासूनच शिक्षक रूजू झाल्याचे दाखवण्यात आले. त्यांचे शालार्थ आयडी २०१९ पासून २०२५ पर्यंत गैरमागार्ने तयार करून आठ ते दहा वर्षांच्या थकबाकीची उचलही करण्यात आली. सायबर पोलिसांनी शिक्षकांना नोटीस बजावली आहे.

बनावट कागदपत्रांच्या आधारे शिक्षकांना मान्यता देणे, मान्य ठरावामध्ये फेरबदल करून खोटे नियुक्तीपत्र देणे, खोटे रुजू अहवाल आणि खोट्या व बनावट नियुक्त्या, पदोन्नती दाखवून शासनाची दिशाभूल केल्याच्या आरोपाखाली नागपूर विभागीय माजी उपसंचालक वैशाली जामदार यांची चौकशी होणार आहे. सदर पोलिसांनी त्यांना तशी नोटीस दिली असून बुधवारी सकाळी सदर पोलीस ठाण्यात हजर राहण्याच्या सूचना केल्या होत्या. परंतु, रोज नवीनवीन कारणे सांगून जामदार चौकशीपासून टाळाटाळ करीत आहेत.

# दोन अपघातात पाच ठार

## भंडारानजिक चौघांचा तर समृद्धीवर एकाचा मृत्यू



■ महासागर प्रतिनिधी
भंडारा / बुलढाणा, दि. २८ :
मुंबई-कोलकाता राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात झाला बोलोरो आणि ट्रकमध्ये झालेल्या भीषण अपघातात चौघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे.

भंडारानजिकच्या बेला येथील साईप्रसाद हॉटेल समोर रविवारी रात्री ११ च्या सुमारास ही घटना घडली. रायपूरकडून बोलेरो वाहन नागपूरकडे जात होते. यात ५ जण प्रवास करीत होते. बेला गावात महामार्गाच्या कडेला असलेल्या हॉटेल साईप्रसादमध्ये हे सर्व जेवण करण्यासाठी महामार्गावरून वळत असताना नागपूरकडून भरधाव आलेल्या ट्रकवर आदळले. यात चौघांचा मृत्यू झाला. तर, चालक गंभीर जखमी आहे. अशोक फुलचंद डेहरवाल, शैलेंद्र लेखाराम बघेले, शैलेश पन्नालाल गोकुळपुरे, मुकेश बिंजेवार अशी मृतकांची नावे असून, अविनाश नाकतोडे जखमी आहे.

घटनेची माहिती मिळतात भंडारा पोलिस आणि गडेगाव महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्तांना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविले. अपघातानंतर महामार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. अपघातग्रस्त वाहनांना महामार्गावरून हटवून वाहतूक पूर्ववत सुरू केली.

सोमवारी पहाटे समृद्धी महामार्गावर अपघातात चालक ठार तर त्याचा सहकारी गंभीर जखमी झालो. दोघे अपघातग्रस्त छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रहिवासी आहेत. जखमीवर दुसरबीड (ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा) येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात उपचशर करण्यात येत आहे.

बिडकीन (जि. छत्रपती संभाजीनगर) येथून कांदा घेऊन नागपूरकडे जाणाऱ्या टाटा आयशर वाहनच्या चालकाला रस्त्यात डुलकी लागली. यामुळे हे वाहन मीडियम मधील दिशादर्शक आयसी-१२ पोलला भर वेगात धडकले. या अपघातात चालक गणेश गायकवाड (४०) यांचा जागीच मृत्यू झाला. सहकारी मच्छिंद्र क्षीरसागर हा गंभीर जखमी झाला आहे.



अपघातानंतर जखमी व्यक्ती व मृत चालकाला सरकारी रुग्णवाहिकेच्या मदतीने ग्रामीण रुग्णालय दुसरबीड येथे हलविण्यात आले. अपघातामुळे काही वेळ मार्गावरील वाहतूक ठप्प झाली. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी महामार्ग पोलीस दाखल झाले. पोलीस निरीक्षक शैलेश पवार, पोलीस हवालदार रोशन, पोलीस शिपाई संदीप किरके, भुतेकर यांच्यासह क्युआरव्ही ॲम्बुलन्स टीमने तत्काळ धाव घेऊन वाहतूक सुरळीत केली. या घटनेचा पुढील तपास सिंदखेड राजा तालुक्यातील किनगाव राजा पोलीस ठाण्याचे ठाणेदार करीत आहे.

# शिंदे गावाला.... लंडनला नव्हे!

## मंत्री उदय सामंत यांचे विरोधकांना प्रत्युत्तर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे काही दिवसांपूर्वी त्यांच्या दरे या गावी गेले होते. तर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे कुटुंबासोबत लंडनला गेले आहेत. दरेवारी आणि लंडनवारीची सध्या तुलना केली जात आहे. यावरून राज्याचे उद्योगमंत्री व शिवसेना शिंदे गटाचे नेते उदय सामंत यांनी प्रतिक्रिया देत निशाणा साधला आहे.



एकनाथ शिंदे हे महाराष्ट्रात त्यांच्याच गावाला गेले, तुमच्या नेत्यांसारखे सुटी घालवण्यासाठी लंडनला गेले नाहीत, असा टोला सामंत यांनी लगावला आहे.

सामंत म्हणाले, एकनाथ शिंदे हे उद्धव ठाकरेंच्या नेहमीच टार्गेटवर असतात. त्यांनी काहीही चांगले केले तरी ठाकरे सेनेच्या लोकांना ते पचत नाही. काश्मीरमध्ये अडकलेल्या पर्यटकांना सोडवण्यासाठी ते पहलगामला धावून गेले त्यावरही टीका केली, त्यानंतर शेती पाहण्यासाठी आपल्या दरे गावात गेले तेही त्यांना रुचले नाही. शिंदे हे आपल्याच गावाला गेले, तुमच्या नेत्यांसारखे सुटी घालवण्यासाठी लंडनला गेले नाहीत.

पुढे बोलताना उदय सामंत म्हणाले, एकनाथ शिंदे चाळीस आमदार घेऊन बाहेर पडले होते. अडीच वर्षे मुख्यमंत्री झाले. त्यांच्याच नेतृत्वात महायुतीने विधानसभेची निवडणूक लढली. पुन्हा महायुतीचे सरकार आले. शिवसेना आणि सेनेचा धनुष्यबाणही त्यांनाच मिळाला. त्यामुळे उद्धव सेनेच्या नेत्यांना ते चांगलेत खटकत आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या प्रत्येक गोष्टीला ते विरोध करतात.

कोणी कुठे जायचे यावर आम्ही कधी बोलत नाही. त्यांच्या घरातील सगळी मंडळी लंडनला गेली, तरीही आम्ही टीका करत नाही. हा आमच्या मनाचा मोठेपणा आहे. शिंदे यांच्यावर टीका केल्याने आमचे काही बिघडणार नाही. मात्र शिंदे यांच्यामुळे अनेकांचे अस्तित्व संपले, त्यामुळे ते सतत टीका करत असतात, अशा शब्दात उदय सामंत यांनी ठाकरे गटाला खडेबोल सुनावले.

# फडणवीसांनी वॉर्निंग देताच नरमले गायकवाड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचे आमदार संजय गायकवाड यांनी महाराष्ट्र पोलिसांबाबत केलेल्या विधानानंतर संपूर्ण महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली होती.

महाराष्ट्र पोलिसांएवढं अकार्यक्षम खातं फक्त भारत नव्हे तर अख्ख्या जगातही नाही. शासनाने पोलीस खात्याशी संबंधित कोणताही कायदा केला की त्यांचा एक हफ्ता वाढतो, असा गंभीर स्वरुपाचा आरोप त्यांनी केला होता. दरम्यान, या विधानानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कडक शब्दांत इशारा दिल्यानंतर गायकवाड यांनी जाहीरपणे दिलगिरी व्यक्त केली आहे.

संजय गायकवाड यांनी केलेल्या मी केलेल्या विधानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचाही मला फोन आला होता. पण महाराष्ट्रातील संपूर्ण पोलिसांचं धैर्य खचवणं, त्यांचं साहस, धाडस आणि पराक्रम यांचा अपमान करण्याचं नव्हतं. मला जे अनुभव आले होते, तेच अनुभव मी त्या ठिकाणी मांडले होते.



या शब्दांमुळे महाराष्ट्रातील पोलिसांचे किंवा महाराष्ट्र सरकारची नाचक्की होत असेल तर मी महाराष्ट्र पोलिसांची जाहीरपणे दिलगिरी व्यक्त करतो, असं संजय गायकवाड म्हणाले.

विधानानंतर देवेंद्र फडणवीस यांनी जाहीरपणे नाराजी व्यक्त केली होती. पोलिसांबद्दल असं बोलणं योग्य नाही. मी स्वतः एकनाथ शिंदे यांना सांगणार आहे की, त्यांनी संजय गायकवाड यांना समज द्यावी. ते वारंवार अशा प्रकारची विधानं करत असतील तर कारवाई केली जाईल, अशी तंबीच फडणवीस यांनी दिली होती. त्यानंतर संजय गायकवाड यांनी जाहीर दिलगिरी व्यक्त केली आहे.

गायकवाड यांच्या याच विधानाबाबत नंतर एकनाथ शिंदे यांनीदेखील भाष्य करीत प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

# सामाईक परीक्षा घोटाळ्याची चौकशी करा : सपकाळ

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८ :
महाराष्ट्र सरकारने राज्य सामाईक परिक्षा (एमएचटी सीईटी सेल यांच्या माध्यमातून रविवार २७ एप्रिल रोजी परीक्षा घेतली. पण या परिक्षेतील घोळामुळे विद्यार्थी व पालकांची चिंता वाढवली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील केंद्रावर ५० गुणांच्या गणिताच्या पेपरमध्ये २० ते २५ प्रश्नांसाठी उत्तराचे पर्याय चुकीचे होते अशी तक्रार विद्यार्थ्यांनी केली आहे. हा अतिशय गंभीर प्रकार असून विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान न करता त्यांना या प्रश्नांचे गुण द्यावेत, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सोमवारी एका पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली.



हर्षवर्धन सपकाळ आपल्या पत्रात म्हणतात की, गणिताच्या प्रश्नांमधील उत्तराचे पर्याय चुकीचे होते. काही प्रश्नांचे चारही पर्याय चुकीचे होते, पण विद्यार्थ्यांना सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक असल्याने त्यांना नाईलाजाने चुकीचे पर्याय निवडावे लागले.

याबाबत विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्राकडे तक्रार केली असता त्यांची साधी दखलही घेतली नाही. राज्य सरकारने हे प्रकरण गांभिर्याने घ्यावे व ज्यांना हे काम होते त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, असे सपकाळ म्हणाले.

# मानसिक आरोग्य म्हणजे काय ?




लोकारोग्य

संत तुकाराम महाराजांचा एक अभंग आहे. "मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण" अर्थात आपलं मन जर प्रसन्न, आनंदी असेल तर सर्व गोष्टी व्यवस्थित होतात. आपली जीवनशैली अत्यंत धकाधकीची आणि तणावयुक्त बनलेली आहे. याचा दुष्परिणाम मनावर होत असतो. अर्थात, मनावरचा ताण जर वाढला तर मानसिक आजाराच्या समस्या उद्भवतात आणि मनुष्य मनोविकारी बनू शकतो. म्हणूनच आपण प्रत्येकाने आपलं मानसिक आरोग्य जपणं, सुदृढ ठेवणं अत्यंत गरजेचं आहे. मुळात मानसिक आरोग्य म्हणजे काय? ॥नसिक आरोग्य सुदृढ ठेवण्याची गुरुकिल्ली नेमकी कोणती? याविषयी नागपूरच्या प्रादेशिक मनोरुग्णालयात मानसोपचारतज्ञ्ज्ञ डॉ. दीपक अवचट यांच्याशी केलेली बातचीत.

**मानसिक आरोग्य म्हणजे नेमकं काय?**

○ मानसिक आरोग्य म्हणजे काय हे समजून घेण्यासाठी अगोदर आपण आरोग्य म्हणजे काय हे समजून घेणं महत्वाचं आहे. मानवी शरीराच्या काही गरजा आहेत. काही कारणामुळे आपल्याला जर मानसिक तणाव आला, जीवनात खूप नैराश्य आलं तर त्याचा आपल्या मनावर जो परिणाम होतो त्याला मानसिक आजार म्हणतात. अर्थात मानसिक आजार हे मानसिक आरोग्य बिघडवतात.

**एखाद्या व्यक्तीच मानसिक आरोग्य उत्तम आहे हे कस ओळखायचं?**

○ सर्वसाधारण माणसं आनंदाने आपलं आयुष्य जगतात. त्यांची विचारधारा सशक्त आणि विचार सकारात्मक असतात. जीवनातील छोट्यामोठ्या समस्यांचा सामना करण्याची आणि त्या समस्यांवर तोडगा काढण्याची त्यांची क्षमता असते, असे लोक मानसिक हष्ट्या सक्षम असतात. परंतु एखादी व्यक्ती अनेक दिवस उदास असेल, एकटीच बडबडत असेल, चारचौघांमध्ये मिसळत नसेल, अशा व्यक्तीला झोप येत नसेल, काही भास होत असतील तर अशा व्यक्तीची मानसिक स्थिती बिघडलेली आहे असं म्हणता येईल. अनेकदा ही अवस्था जर अनेक आठवडे राहिली तर प्रचंड नैराश्य येऊन अशा व्यक्तीला मानसिक विकार देखील जडतात. मानसिक आजार हे ओळखता येत नाहीत ते समजून घेणं महत्वाचं असतं.

**मानसिक आजाराचे प्रकार कोणते आहेत?**

○ मानसिक आरोग्य आणि मानसिक आजार या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. एखादा मनुष्य सर्वसाधारण असतो जो जीवनातील समस्यांचा सामना करू शकतो त्याच मानसिक आरोग्य हे उत्तम आहे असं म्हणता येईल. परंतु एखादी व्यक्ती काही दिवसापेक्षा अनेक दिवस जर नैराश्यात असेल, त्याच्या मनात सातत्याने नकारात्मक विचार नयेत असतील, त्याला इतरांशी बोलावंसं वाटत नसेल, चारचौघात मिसळावं असं वाटत नसेल तर ती व्यक्ती मानसिक दृष्ट्या आजारी असते.

मनाचे स्क्रिझोफिनिया, डिफेंशिया, बायपोला डिसऑर्डर, डिप्रेशन असे अनेक आजार आहेत. या पैकी स्किझोफोर्निया मध्ये एखाद्या व्यक्तीला लोक आपल्याबद्दल बोलतायत, कुजबुज करतायत, आपल्याला हसतायत असे भास होतात . ही गोष्ट सहा महिने असेल तर तो स्क्रिझोफोर्निया आहे असं म्हणता येईल. एखाद्या मोठ्या आघातामुळे किंवा मनावर सातत्याने येणाऱ्या तणावामुळे मनुष्य एकांतात जातो, खूप एकटा वागतो, त्याला कसलीच इच्छा होत नाही ते नैराश्य असते.

**आपलं मानसिक आरोग्य सुदृढ राखण्यासाठी उपाय काय आहेत?**

आपल्या मनाच आरोग्य चांगलं, स्वस्थ राखण ही अगदी सोपी गोष्ट आहे त्यासाठी फार काही वेगळं करणं गरजेचं नाही. आपला आहार आपण वेळेवर घेणं आणि आपल्या आहारात शरीरासाठी पोषक सर्व घटकांचा समावेश असेल असा आहार घेणं महत्वाचं आहे.

शिवाय रोजच्या रोज व्यायाम करणं, वाचन, संगीत ऐकणं, किंवा असाच एखादा मनाला विरंगुळा मिळेल असा छंद जोपासणं महत्वाचं असतं. समाजातील इतर लोकांमध्ये मिसळणं, आपल्या मित्रांचा एक ग्रुप करून त्यांच्याशी संवाद साधन, व्यक्त होणं आपल्या समस्या शेअर करणं हे मनाच्या आरोग्यसाठी खूप महत्वाचं आहे. मानसिक लवचिकता वाढवणं देखील तितकच महत्वाचं आहे. सतत सकारात्मक वृत्तीने जगता आलं पाहिजे. अशा गोष्टीमुळे मन प्रसन्न राहत आणि मानसिक आजारांचा त्रास न होता आपलं मानसिक आरोग्य सदृढ राहते. ■ ■ ■

## कर्करोग उपचारात ॲबव्हीने व्हेनेटोक्लॅक्सच्या माध्यमातून भारतात वाढवली व्याप्ती

ॲक्युट मायलॉइड ल्युकेमिया (एएमएल) या दुर्मिळ आणि गतिशील रक्त कर्करोगाबद्दल जागरूकता वाढवण्यासाठीच्या जागतिक मोहिमेअंतर्गत आज जागतिक एएमएल जागरूकता दिन साजरा केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर, परिवर्तन घडवणारी औषधे निर्माण करण्यासाठी कटिबद्ध असलेल्या जागतिक बायोफार्मास्युटिकल क्षेत्रातील आघाडीची कंपनी ॲबव्ह ने भारतात कर्करोग उपचार क्षेत्रात पदार्पण करण्याची घोषणा केली आहे. कंपनीने ॲक्युट मायलॉइड ल्युकेमिया आणि क्रॉनिक लिम्फोसाइटिक ल्युकेमिया या दोन्ही प्रकारच्या कर्करोगांवर उपचारासाठी व्हेनेटोक्लॅक्स हे औषध तयार केले आहे. ॲक्युट मायलॉइड ल्युकेमिया हा एक वेगाने पसरणारा रक्त आणि अस्थिमज्जाचा कर्करोग आहे. यात उपचार पर्याय मर्यादित असतात आणि रुग्णांच्या जगण्याची शक्यता कमी असते. व्हेनेटोक्लॅक्स हे बीसीएल-२ इनहिबिटर औषधांच्या श्रेणीतील पहिले औषध आहे. हे रक्त आणि अस्थिमज्जातील कर्करोगाच्या पेशींना निवडकपणे लक्ष्य करून एक नवीन उपचार पद्धती देते. विशेषतः वय किंवा इतर आरोग्य समस्यांमुळे पारंपरिक तीव्र केमोथेरपी घेऊ शकत नसलेल्या रुग्णांसाठी हे आशेचा किरण ठरते.नवी दिल्लीच्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या (अक्क्टर) अलीकडील आकडेवारीनुसार, भारतात एएमएलचे प्रमाण दर १,००,००० लोकसंख्येमध्ये २.५ रुग्ण इतके आहे. एएमएल असलेल्या रुग्णांसाठी, विशेषतः जे तीव्र केमोथेरपीसाठी सक्षम नाहीत, त्यांच्यासाठी उपचाराच्या अधिक संधी उपलब्ध करण्याची तीव्र गरज दिसून येते. ■ ■ ■

## पईच्या बियांचे फायदे



पपईच्या बिया केवळ आरोग्यासाठीच नाही तर त्वचेसाठीही फायदेशीर असतात. त्यांचे मर्यादित प्रमाणात सेवन केल्याने आपले आरोग्य चांगले राहते शिवाय सौंदर्यातही भर पडते.

ज्या व्यक्तींना आपले वजन कमी करायचे आहे अशांनी पपईच्या बियांचाही वापर करावा. आपण या बियांना सुकवून ठेवू शकतो आणि त्याची पावडर बनवून सुद्धा विविध पदार्थांसोबत त्याचे सेवन करू शकतो. ज्या व्यक्तींना शुगर तसेच पचनासंबंधीची समस्या असेल यावर सुद्धा या बिया अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. त्याचबरोबर पपईच्या बिया शरीरामध्ये कॅन्सर पेशींची वाढ होण्यापासून सुद्धा रोखतात. ज्यांना पचनासंबधी किंवा बद्धकोष्ठताची समस्या असेल. त्यांच्यासाठी तर पपईच्या बिया या रामबाण उपाय असतात. तीन ते चार बियांचे सेवन केल्यास तर बद्धकोष्टतेची समस्या लवकरच दूर होते. जर एखाद्या व्यक्तीला चिकनगुनिया, मलेरिया, डेंगू यासारखे आजार झाले असतील तर अशा वेळीसुद्धा पपई खाण्याचा सल्ला दिला जातो. पपईच्या पानांचा रस प्यायल्याने शरीरातील प्लेटलेट्सची संख्या वाढते. पोटामध्ये गॅस निर्माण झाला असेल तर कच्च्या पपईची भाजी सुद्धा बनवून तुम्ही खाऊ शकता किंवा पपईच्या बियांचेही सेवन करू शकता. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# कोणतीही निवडणूक रोखण्याचा सर्वोच्च न्यायालयाला अधिकार नाही

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८ :
राज्यातील लांबलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवरून वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी महायुती सरकार व निवडणूक आयोगावर निशाणा साधला आहे. सर्वोच्च न्यायालयाला कोणतीही निवडणूक रोखण्याचा अधिकार नाही. पण निवडणूक आयोगाला निवडणूक घेण्यासाठी कणा नाही हे दुर्दैव आहे, असे आंबेडकर यांनी म्हटले आहे.



मागील ३ वर्षांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर टाकल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांनी ही टीका केली आहे. ते म्हणाले, राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर सर्वप्रथम कोर्टात भूमिका मांडणे आवश्यक आहे. कारण, सुप्रीम कोर्टाला कोणतीही निवडणूक रोखण्याचा अधिकार नाही. पण दुर्दैव असे की निवडणूक आयोगाला निवडणूक घेण्यासाठी आवश्यक असणारा कणाच नाही. संविधानाने स्पष्टपणे सुप्रीम कोटार्ला निवडणूक रोखण्याचा अधिकार नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने हिंमत दाखवून निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला पाहिजे.

पहलगाम हल्ल्यानंतर सरकारने थातूरमातूर कारवाई करून वेळ मारून नेण्याचे काम केले. व्हिसा घेऊन आलेल्यांना परत पाठवणे ही कारवाई होत नाही. ते परत जाणारच होते. भारतीय लष्कर कारवाई करण्यास तयार आहे. पण राजकीय नेतृत्व निर्णय घेण्यास घाबरत आहे, कारवाई करण्याचे धाडस सरकारमध्ये नाही, असे म्हणत त्यांनी केंद्रावर टीका केली.

# भोसले घराण्याच्या तलवारीचा होणार लिलाव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
नागपूरच्या भोसले घराण्याच्या ऐतिहासिक तलवारीचा न्यूयॉर्कमधील एका ब्रोकर कंपनी मार्फत ऑनलाईन लिलाव होणार असल्याची माहिती आहे.

ही तलवार श्रीमंत राजे रघुजी भोसले यांची असल्याचा दावा केला जात आहे. प्रस्तुत तलवार केव्हा अन् कशी न्यूयॉर्कच्या ब्रोकर कंपनीकडे पोहोचली? याची कोणतीही माहिती उपलब्ध नाही. पण या तलवारीच्या इतिहासाचा मागोवा घेण्यासाठी अनेक इतिहासकार व नागपुरातील भोसले घराण्याचे वंशज उत्सुक आहेत.



ऑनलाईन ब्रोकर कंपनीने 'सोथबाय' या कंपनीतर्फे ही तलवार विक्रीला ठेवली आहे. ही कंपनी ब्रिटीशांनी स्थापन केलेली बहुराष्ट्रीय कंपनी असली तरी तिचे मुख्यालय न्यूयॉर्कला आहे.

कंपनीने ७ हजार ग्रेट ब्रिटन पाऊंडपासून (७.९५ लाख रुपये) लिलाव सुरू करण्यात येणार आहे. या लिलावासाठी नोंदणी करणे अनिवार्य आहे. हा प्रकार समोर आल्यानंतर भोसले घराण्याला देखील धक्का बसला आहे. ही तलवार आमच्याकडे परत यावी यासाठी आमचा पूर्ण प्रयत्न असल्याची माहिती राजे मुधोजी भोसले यांनी दिली.

संबंधित तलवार कंपनीपर्यंत कशी पोहोचली हे मोठे कोडेच आहे. १८५३ ते १८६४ या कालावधीत महाराज श्रीमंत राजे मुधोजी महाराज भोंसले (दुसरे) उर्फ (आप्पासाहेब महाराज) यांच्या नेतृत्वात मराठा विरुद्ध ब्रिटिश युध्द झाले होते. त्याच कालावधीत इंग्रजांनी ब्रिटीशांनी नागपूरकर भोसल्यांचा खजिना लुटला होता. त्यात अनेक रत्नजडित दागदागिने, शस्त्रसाठा व तलवारींची लूट करण्यात आली होती. त्या लुटीत कदाचित ही तलवार गेली असावी अशी शक्यता आहे.

## खरीखरी

# पाकिस्तानातले भगोडे

पान १ वरून....

त्यासोबतच आम्ही वर म्हटल्याप्रमाणे 1971 मध्ये जे झाले. त्यानुसार आताही लष्कर प्रमुख असिफ मुनीर यांना शरणागती पत्करणे भाग पडणार आहे. त्याच मुनिराने पाकिस्तानची मृत्यू घंटाच लिहून ठेवलेली दिसते. एक तर पाकिस्तानात प्रादेशिक वाद मोठ्या प्रमाणात उफाळलेला आहे. सिंध प्रांत, बलुचिस्तान आणि वायव्य सरहद्द प्रांत सर्वच वेगळे होऊ इच्छितात. ज्याप्रमाणे 1971 मध्ये बांगलादेश स्थापन झाला. तशीच परिस्थिती आताही उद्भवणार आहे. आज पाकिस्तानचे लष्कर आणि सत्ता पाकिस्तानातील पंजाब्यांच्या हाती आहे. त्यामुळे आणि त्यांच्या मनमानीमुळे इतर विभागात अत्यंत जबरदस्त आक्रोश आहे. भारताला पाकिस्तानात न जाता ही सायबर हल्ले करता येतात. पाणीपुरवठा खंडित करता येतो. वीज, बँकिंग, दूरसंचार सेवा अस्ताव्यस्त करता येते. गरज पडली तर पाणी सोडून पूर परिस्थिती आणता येते. पण भारताच्या लष्कराला बहुधा आहे मान्य नसावे. त्यांना तर या नागड्या पाकड्यांना आपल्या चरणावर लोटांगण घातलेले पाहायचे आहे. भारताच्या या इराद्याला जगातील कोणीही आव्हान देऊ शकत नाही. एकमेव चीन हा देश वगळता कोणीही पाक बरोबर येणार नाही. चीनलाही शाब्दिक सहानुभूती आणि गुप्त मदतीशिवाय फारसे काही करता येणार नाही भारताच्या प्रचंड मोठ्या बाजारपेठेवर पाणी सोडणे चीनला शक्य होणार नाही. अमेरिकेच्या दादागिरी पुढे चीनला सुद्धा आपला माल विकण्यासाठी भारताचीच गरज आहे. पहलगामच्या हल्ल्यानंतर भारतावर अणू प्रयोग करण्याची धमकी पाकिस्तानच्या एका महामूर्ख नेत्याने दिलेली आहे. पण अण्वस्त्रांचा प्रयोग किंवा उपयोग करणे तितके सोपे नाही. हे त्या पागल माणसाला कोणी तरी सांगितले पाहिजे. पाकिस्तानी लष्कर आणि आयएसआय यांना सिंधू नदीच्या पाण्यात बुडविणे हेच आता भारताचे लक्ष आहे. आता भारताच्या भीतीमुळे पाकिस्तानच्या लष्करातील घरंदाज पळपुटे म्हणजेच भगोडे किती दिवसात लष्कर सोडून पळतात. ते आपल्याला बघायचे आहे. अशा परिस्थितीत पाकिस्तानला कोणताही पर्याय दिसत नसल्यामुळे केवळ शब्दकोट्या करून आपली शाब्दिक बहादुरी दाखवणे. एवढेच कार्य त्यांच्यासाठी शिल्लक आहे. भारतातील सर्व पक्षांचा पाठिंबा सरकार बरोबर आहे. त्यामुळे आता पाकिस्तानची सुरू असलेली लष्करी बळ-बळ आणि त्यांच्या नेत्यांची वाचाळ वळवळ, वळचणीला लावून भारतीय बहाद्दरांनी पाकड्यांची लवकरात लवकर जिरवावी. एवढीच आमची माफक अपेक्षा आहे. बोला, भारत माता की जय!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023